सोलापूर
Solapur Tarun Bharat
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शनिवार, २८ सप्टेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक १८६ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## शेतकऱ्यांना दिलासा, ग्राहकांना फटका!

मुंबई दि.२७..
यंदा देशभरात चांगला पाऊस झाला आहे. सध्या परतीचा मान्सून देशातील अनेक भागात धुमाकूळ घालताना दिसत आहे. या पावसामुळं अनेक भागात शेती पिकांना फटका देखील बसला आहे. दरम्यान, सध्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांना अच्छे दिन आले आहेत. कांद्याच्या दरात चांगली वाढ जाली आहे. मात्र, दुसरीकडे ग्राहकांच्या खिशाला झल लागत असल्याचं बोललं जात आहे. सध्या कांद्यासह टोमॅटो तसेच हिरव्या भाज्यांचे भाव देखील वाढले आहेत.



# स्थानिक गुन्हे शाखेने आंतरजिल्हा मोटार सायकल चोरी करणारी टोळी केली जेरबंद




**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२७ सप्टेंबर**

पोलीस अधीक्षक यांनी मोटार सायकल चोरीचे जास्तीत जास्त गुन्हे उघडकीस आणण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेला आदेश दिलेले आहे. त्यावरून श्री. उस्मान शेख, पोलीस निरीक्षक, स्था. गु शा बीड यांनी मोटार सायकल चोरी करणारे आरोपींची गोपनिय माहिती काढुन गुन्हे उघडकीस आणण्यासाठी अधिपत्याखालील अधिकारी यांना योग्य मार्गदर्शन केले. त्यावरुन दिनांक २७/०९/२०२४ रोजी पोउपनि श्री. श्रीराम खटावकर व त्यांचे पथक पो.स्टे. शिवाजीनगर गुरनं ४७०/२०२४ कलम ३०३ (२) भा.न्या.सं. या मध्ये चोरी गेलेल्या मोटार सायकलचा समांतर शोध घेत असतांना गोपनिय माहिती मिळाली की, दोन इसम चोरीची स्पेंडर प्लस मोटार सायकल घेवुन गेवराई येथील चिखली येथे येणार असल्याची खात्रीलायक खबर मिळताच पोलीस निरीक्षक श्री. उस्मान शेख यांना खबर देवुन त्यांनी तात्काळ कारवाई करण्यासाठी सुचना दिल्या. त्यावरुन पोउपनि खटावकर यांनी गेवराई येथे पथकासह सापळा लावुन बामती प्रमाणे मोटार सायकल वरुन येणाऱ्या दोन इसमांना ताब्यात घेवुन नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नावे १) रमेश छबु गिरे वय २६ रा.चिखली ता. गेवराई. २) मच्छिंद्र बबन राठोड वय २२ रा.मानसिंगतांडा ता. गेवराई असे सांगितले. त्यांना त्यांचेकडे असलेली मोटार सायकल बद्दल विचारले असता त्यांनी सदर मोटार सायकल चोरी केली असल्याचे सांगितले व त्यांचेकडे अधिक चौकशी केली असता त्यांनी बीड शहर. दिंद्रुड, गेवराई, पाटोदा, माजलगाव, तलवाडा, तसेच पाथर्डी, अंबड, शेवगाव परिसरातुन मोटार सायकली चोरलेल्या असल्याचे सांगितले. तपासात नमुद आरोपीतांचे ताब्यातुन एकुण १६ मोटार सायकली जप्त करण्यात आलेल्या असुन १२ मोटार सायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आलेले आहेत. त्यामध्ये बीड जिल्हयातील विविध पो.स्टे.अंतर्गत ०९ गुन्हे, जालना व अहमदनगर जिल्यातील ०३ उघडकीस आले आहेत. आरोपींकडुन एकुण ७,६३,०००/- रु किंमतीच्या मोटार सायकली असा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

आरोपी नामे रमेश छबु गिरे रा. चिखली ता. गेवराई याचा पुर्व गुन्हे अभिलेख पाहता त्याने पुर्वी शिरुर कासार हद्दीमध्ये जनावर चोरी केल्याबाबत गुन्हा दाखल आहे. सदर आरोपीतांकडुन आणखी इतर गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता असुन दोन्ही आरोपी व १६ मोटार सायकलचा मुद्देमाल पो. स्टे शिवाजीनगर यांचे ताब्यात देण्याची प्रक्रिया चालु आहे.सदरची कामगिरी मा.श्री. अविनाश बारगळ, पोलीस अधीक्षक, बीड, मा.श्री. सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक बीड, श्री. उस्मान शेख पोलीस निरीक्षक स्था.गु.शा.बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि श्रीराम खटावकर, सफौ/संजय जायभाये, पोह/अशोक दुबाले. कैलास ठोंबरे, दिपक खांडेकर, सोमनाथ गायकवाड, बाळु सानप, विकास वाघमारे, अर्जुन यादव, देविदास जमदाडे, निलेश ठाकुर, विकी सुरवसे, सिध्देश्वर मांजरे यांनी मिळून केलेली आहे

# अंबाजोगाईत पिस्टलसह एकास घेतले ताब्यात

## स्थानिक गुन्हे शाखा बीडची कामगिरी

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२७ सप्टेंबर**

अंबाजोगाईत पिस्टलसह एकास घेतले ताब्यात जिल्ह्यातील अंबाजोगाई येथे यशवंतराव चव्हाण चौकात गावठी कट्टा (पिस्टल) जप्त करत एकास ताब्यात घेतले आहे. ही कारवाई बीड स्थानिक गुन्हे शाखेने केली.

पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांनी बीडचा पदभार घेतल्यापासून कारवायांचा धडाका सुरू केला आहे. या कारवायांमुळे जिल्ह्यातील अवैध धंदे करणारे आणि गुन्हेगारी वृत्तीच्या लोकांमध्ये घबराट पसरली आहे. नुकतेच पाडसिंगी आणि उमापूर येथे तलवारींचा साठा जप्त केला. यानंतर अंबाजोगाई येथे एकजण कंबरेला गावठी कट्टा (पिस्टल) लावून फिरत असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उस्मान शेख यांना मिळाली होती. माहिती मिळताच पोलीस निरीक्षक उस्मान शेख यांनी एक पथक अंबाजोगाई येथे पाठविले या पथकाने अंबाजोगाई शहरातील यशवंतराव चव्हाण चौकात संशयित व्यक्तीला पकडून झडती घेतली असता त्याच्या कमरेला गावठी कट्टा पिस्टल आणि जिवंत कारतूस असे एकूण ४४ हजारांचा मुद्देमाल मिळून आला. तो जप्त करुन आरोपी अमित उर्फ सोन्या सुंदर गायकवाड रा. सदर बाजार अंबाजोगाई यास ताब्यात घेतले. सदरील आरोपीवर अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, स्थानिक गुन्हे शाखा पोनि उस्मान शेख यांचे मार्गदर्शनाखाली ग्रेपोउपनि हनुमान खेडकर, पोह मारुती कांबळे, राजु पठाण, महेश जोगदंड, तुषार गायकवाड व चालक गणेश मराडे यांनी केली आहे.



# सावरकर महाविद्यालयात हिंदी सप्ताहाची सांगता

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२७ सप्टेंबर**

येथील स्वा. सावरकर महाविद्यालयात नुकतेच १४ सप्टेंबर ते २१ सप्टेंबर २०२४ या कालावधीत हिंदी सप्ताहाचे आयोजन केले गेले होते. या सप्ताहा समारोपाची सांगता नुकतीच महाविद्यालयात पार पडली. याप्रसंगी आयोजित कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून प्रसिद्ध पत्रकार उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, प्रमुख उपस्थिती म्हणून उपप्राचार्य प्रो. डॉ. उत्तम साळवे हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक हिंदी विभाग प्रमुख डॉ. राजेंद्र सोनवणे यांनी केले तर प्रमुख पाहुण्या म्हणून महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थीनी सौ. के एस के महाविद्यालयाच्या हिंदी विभागात कार्यरत प्रा. शितल इगडे बोलताना म्हणाल्या कि हिंदी ही रोजगार सक्षम भाषा असून या भाषेत रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. भारतसरकारच्या अनेक कार्यालयात बँकेत वृत्तमानपत्रात, इलेक्ट्रॉनिक मीडियात विद्यार्थ्यांना अनेक रोजगार उपलब्ध आहेत. आज चांगले अनुवादक आणि इंटरपीटर मिळत नाहीत अशी खंत ही त्यांनी व्यक्त केली.

या कार्यक्रमात पवन कपाळे यांचे हिंदी भाषेतील अशुद्धी लेखन या विषयी भित्तीपत्रकांचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.संतोष शिंदे यांनी केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने हजर होते.




# सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या सय्यद शाहेदला आंतर महाविद्यालयीन बॉडी बिल्डिंग स्पर्धेत रौप्य पदक



**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२७ सप्टेंबर**

दि. २६ ते २७ रोजी वि.पा.कॉलेज वैजापूर येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन बॉडी बिल्डिंग स्पर्धेमध्ये सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या सय्यद शाहेद ने रौप्य पदकाची कामगिरी केली,

या खेळाडूला क्रीडा शिक्षक प्रा. प्रविण कोरडे. प्रा नवनाथ आवारे प्रा. सुखदेव माने. प्रा डॉ. सी. डी. फड यांचे मार्गदर्शन लाभले.यशस्वी खेळाडूंचे म. शि. प्र. मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रकाश दादा सोळंके, यांच्यासह ॲड.बी.आर. डक, सत्यप्रकाश रुद्रवार, निळकंठ साबळे, डॉ. सुनील गरड, वगरे नाना, प्राचार्य डॉ. जी. के. सानप, उपप्राचार्य डॉ. एन. के. मुळे, उपप्राचार्य डॉ. एम. ए कव्हळे, प्रा. प्रकाश गवते, प्रा. पवनकुमार शिंदे, पर्यवेक्षक प्रा.टाक सर, प्रा.अलझेंडे सर,प्रबंधक प्रशांत चव्हाण, अधीक्षक सतीश एरंडे, मस्के सर यांनी अभिनंदन केले.

# उपविभागीय अधिकारी कार्यालयातील निलेश मेश्राम लाच घेतांना रंगेहाथ पकडला

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२७ सप्टेंबर**

बीड येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयात कार्यरत असणारा निलेश धर्मदास मेश्राम याला ७ हजार रूपयांची लाच घेतांना आज दि.२७ शुक्रवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील कौटूंबिक न्यायालयातील जुनी इमारत उपविभागीय कार्यालय रूम नं १०९ या ठिकाणी ७ हजार रूपयांची लाच घेतांना रंगेहाथ पकडले.

या संदर्भात माहिती अशी की, गेवराई हद्दीतील राक्षसभूवन रोड व जयहिंद नावाचे हॉटेल असून सदर हॉटेलवर दारूबंदी विभागाकडून व गेवराई पोलिस ठाण्याकडून ६५ ई प्रमाणे २ गुन्हे दाखल होते. त्या गुन्ह्यात त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यासाठी त्यांना उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय बीड येथून कलम ९३ ब प्रमाणे त्यांच्यावर प्रतिबंधक कारवाई करण्यासाठील नोटीस बजावण्यात आली होती. त्या नोटीसच्या अनुषंगाने बंदपत्र लिहून देण्यासाठी व सदर प्रकरण बंद करण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे याने स्वत:साठी २ हजार रूपये व महिला उपविभागीय अधिकारी यांच्यासाठी ५ हजार रूपये अशी एकूण ७ हजार रूपये लाचेची मागणी पंचासक्षम करून सदर लाच पंचसाक्षीदारासमक्ष स्विकारली आहे. या संदर्भात मेश्राम यांना ताब्यात घेतले असून बीड शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरील कारवाई संभाजीनगर येथील लाचलुचपत पोलिस निरीक्षक शिवाजीनगर हरिदास डोळे पोलिस निरीक्षक, वाल्मिक कोरे लाचलुचपत प्रतिबंधक संभाजीनगर पोलिस निरीक्षक यांनी संदिप आटोळे पोलिस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्गदर्शनाखाली मुकूंद आघाव अप्पर पोलिस अधीक्षक, सुरेश नाईकनावरे पोलिस उपअधीक्षक, पोलिस हवालदार साईनाथ तोडकर, पोह.राजेंद्र ननदिले, चालक सी.एन.बागुल छत्रपती संभाजीनगर यांनी कारवाई केली.



# मुखेड नगर परिषद मुखेड

**नविन प्रशासकीय इमारत, मुखेड ता. मुखेड, जि. नांदेड**

वेबसाईट :- www.nagarparishadmukhed.org
ई-मेल :- comukhed@gmail.com
जा.क्र.:- जा.क्र. ६०७९/२०२४/नपमु कार्यालय मुखेड.

फॅक्स क्र. :- ०२४६१-२२२५६२
टोल फ्रि.क्र. :- १८००-२३३-७५६२
दिनांक . :- २७/०९/२०२४

## निविदा मागविणारी सूचना

मुख्याधिकारी नगरपरिषद मुखेड जि. नांदेड यांच्या वतीने नोंदणीकृत योग्य त्या वर्गातील कंत्राटदारांकडून खालील कामाकरीता निविदा प्रणालीव्दारे (ऑफ लाईन) निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | काम पुर्ण करण्याचा कालावधी | आवश्यक कंत्रात्रदाराचे वर्गीकरण | कोरी निविदा प्रपत्राची किंमत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | भद्रे यांच्या घरापासून ते नगर परिषद सभाग्रह पर्यंत, शाहू नगर येथे नवीन पाईप लाईन करणे बाबत. | २४९४००/- | १०००/- | २ महिने | Appropriate Class | २००/- |

निविदेचा कोरा नमुना नगर परिषद पाणीपुरवठा विभाग येथे दि. २८/०९/२०२४ रोजी वेळ सकाळी ११:०० वा. पासून ते दि. ०४/१०/२०२४ रोजी वेळ सायंकाळी ०५:०० वा. पर्यंत उपलब्ध राहील. सदर परीपूर्णरित्या भरलेल्या निविदा नगर परिषदमध्ये दि. ०४/१०/२०२४ रोजी सायंकाळी ०५:०० वा पर्यंत स्विकारन्यात येतील.

**सूचना**

१. सर्व पंजीबध्द ठेकेदारांनी निविदा प्रपत्र घेण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी नगर परिषदमद्धे नोंदणी करणे आवश्यक आहे.
२. ऑफ लाईन पध्दतीने सादर केलेली निविदा दि. ०५/१०/२०२४ रोजी सकाळी ११:०० वा मुख्याधिकारी नगरपरिषद मुखेड जि. नांदेड यांच्या कार्यालयात उपस्थित कंत्राटदार अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधी यांचे उपस्थितीत उघडण्यात येईल. तरी सर्व संबंधीतांनी वेळेवर उपस्थित रहावे.
३. निविदेच्या अटी व शर्ती निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळातील.
४. सदर कामाची निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार **मुख्याधिकारी नगरपरिषद मुखेड** यांनी राखून ठेवलेले आहेत.
५. निविदा धारकांनी निविदेसोबत निविदा फी व इसारा रक्कम भरणा करण्यात यावी भरणा केलेल्या रक्कमेची प्राप्त झालेली पावती सोबत सादर करावी.

**मुख्याधिकारी**
**मुखेड नगर परिषद, मुखेड**


# फार्मसी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत आरोग्य तपासणी शिबीर

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२७ सप्टेंबर**




अंबाजोगाई शहरातील श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित फार्मसी महाविद्यालयात दि २६ सप्टेंबर गुरुवार रोजी राष्ट्रीय सेवा योजना अतंर्गत आरोग्य तपासणी शिबीर हा उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमाची सुरुवात धनवंतरी व माता सरस्वती देवीच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून करण्यात आली. आरोग्य तपासणी शिबिरासाठी अंबाजोगाई शहरातील नामांकित डॉक्टर प्राजक्ता बर्गे या उपस्थित होत्या.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष तरके हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संतोष तरके यांनी विद्यार्थ्यांना आरोग्य तपासणी करणे खूप महत्त्वाचे व गरजेचे असल्याचे सांगितले. वेळोवेळी आपल्या आरोग्याची तपासणी केल्यामुळे कोणतीही समस्या ओळखता येवून त्यावर तात्काळ उपचार करण्यास मदत होते. त्यामुळे आरोग्य तपासणी नियमितपणे करणे अत्यंत आवश्यक असल्याचे प्राचार्य डॉ संतोष तरके यांनी सांगितले.

या आरोग्य तपासणी शिबिरात क्रोनिक आजार असलेल्या नागरिकांनी तसेच विशिष्ट वयोमानाच्या नागरिकांनी आपल्या आरोग्याकडे विशेष लक्ष देणे अत्यंत आवश्यक असल्याचे डॉ. प्राजक्ता बरगे यांनी उपस्थित विद्यार्थ्यां व नागरिकांना सांगितले. लहान मुलांसाठी देखील आरोग्य तपासणीची आवश्यकता खूप महत्त्वाची आहे. यामुळे त्यांच्या आरोग्याच्या स्थितीवर लक्ष ठेवता येते आणि त्यांचे विविध आजारांपासून संरक्षण करता येते. मुलांच्या आरोग्य तपासणी मुळे त्यांच्या वाढीचा आढावा, निदान, टीकाकरण, मानसिक आरोग्य, जीवनशैलीची माहिती उपलब्ध करता येते. त्यामुळे मुलांसाठी आरोग्य तपासणी नियमितपणे करणे अत्यंत आवश्यक आहे कारण यामुळे त्यांच्या संपूर्ण आरोग्याची काळजी घेता येते आणि त्यांना निरोगी आणि खुशाल जीवन जगण्यास मदत होईल असे मत डॉ प्राजक्ता बर्गे यांनी व्यक्त केले.महाविद्यालया मध्ये घेण्यात आलेल्या आरोग्य तपासणी शिबीरात विविध प्रकारच्या आरोग्य तपासण्या मोफत करण्यात आल्या. त्या मध्ये पल्स रेट, वजन, हीमोग्लोबिन, ऑक्सीजन, सीबीसी, ब्लड ग्रुप, एच बी आणि बीपी च्या तपासणी घेण्यात आल्या. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष तरके यांच्यासह सर्व प्राध्यापक , शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी या कार्यक्रमास उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
शनिवार, २८ सप्टेंबर २०२४ छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित पान नं. ३

## फडणवीसांच्या कार्यालयावर हल्ला करणाऱ्या महिलेची ओळख पटली

मुंबई दि.२७..
राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रालयातील कार्यालयावर हल्ला करणाऱ्या महिलेची ओळख पटली आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रालयातील कार्यालयावर आज (दि.२७) एका महिलेने हल्ला केला होता. त्यानंतर मंत्रालय परिसरात खळबळ उडाली होती. ही महिला देवेंद्र फडणवीसांच्या कार्यालयापर्यंत पोहोचल्याने सर्वांकडून आश्चर्य व्यक्त केले जात होते.

## राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांचा अभीष्टचिंतन सोहळा

# हरिभाऊ नानांनी समर्पित भावनेने राष्ट्र निर्मितीसाठी कार्य केले - ना.नितीन गडकरी

**तभा वृत्तसेवा**
**छत्रपती संभाजीनगर दि.२७,**

राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी सामान्य कार्यकर्ता म्हणून काम केले. आमदार, मंत्री, विधानसभा अध्यक्ष, राज्यपाल असा त्यांचा प्रवास आहे. आयुष्यभर श्री. बागडे यांनी राष्ट्र निर्मितीसाठी समर्पित भावनेने कार्य केले. श्री. बागडे यांचे कार्य आपल्या सर्वांसाठी दिशादर्शक आहे, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज येथे केले.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ज्येष्ठ नेतृत्व व राजस्थानचे महामहीम राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी नुकतेच ८० व्या वर्षात पदार्पण केले आहे. यानिमित्त श्री.बागडे यांचा अभीष्टचिंतन सोहळा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या अध्यक्षतेखाली आज श्री.रामचंद्र मंदिर (मठ) बालाजी ट्रस्ट मैदान, येथे झाला यावेळी ते बोलत होते.

यावेळी गृहनिर्माण, इतर मागास व बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, माजी केंद्रीय राज्य मंत्री डॉ. भागवत कराड, माजी मंत्री राजेंद्र दर्डा, आमदार विक्रम काळे, आमदार प्रशांत बंब, महिला आयोगाच्या माजी अध्यक्ष विजया रहाटकर, रमेश पतंगे, छत्रपती संभाजीनगर कृषी उत्पन बाजार समितीचे सभापती राधाकृष्णन पठाडे, फुलंब्री कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती अनुराधा चव्हाण, माजी महापौर बापू घडामोडे, आयोजन समितीचे अध्यक्ष विवेक देशपांडे, नाशिक काळाराम मंदिराचे पुजारी सुधीर दास महाराज, छत्रपती संभाजीनगर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक दामोदर नवपूते, श्री. विजय औताडे, संजय खंबायाते, उद्योगपती राम भोगले आदी उपस्थित होते.

श्री. गडकरी म्हणाले की, कार्यकर्ता, स्वयंसेवक म्हणून काम करताना अनेक अडचणी होत्या. मात्र बागडे यांनी



त्याकाळी आपले काम निष्ठेने केले. शिक्षण, दुग्ध व्यवसाय, बँक सर्व क्षेत्रात महत्त्वपूर्ण काम केले आहे. कोणत्याही पदाची अपेक्षा न करता त्यांनी केलेले कार्य अनेकांसाठी प्रेरणा देणारे आहे. ते सातत्याने काम करत राहिले, त्यांच्यासारखे कार्यकर्ते घडले पाहिजेत. विचारधारा महत्वाची असते, हेच त्यांनी आपल्या कार्यातून दाखवून दिले आहे. आपल्या देशाची अर्थव्यवस्था जगातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था झाली पाहिजे. त्यासाठी कार्यकर्ता घडला पाहिजे. अलग भाषा अलग वेश, फिर भी अपना एक देश अशी भावना ठेवत देशाला पुढे घेऊन जायचे आहे, असे श्री गडकरी म्हणाले.श्री. बागडे यांनी निस्वार्थ पणाने आयुष्यभर काम केले आहे. आणि त्यांना पदे मिळत गेली. साधी राहणी ही आमची शिकवण आहे. कठीण काळ होता, वीस वर्ष गाव-गावात फिरायचो. आज मान मिळतोय पण तो आमचा नाही तर हरिभाऊ सारख्या कार्यकर्त्यांची मेहनत आहे. कोणत्याही प्रकारची अपेक्षा न करता हरिभाऊ यांनी काम केले. देव दुर्लभ कार्यकर्ता हरिभाऊ यांच्या माध्यमातून लाभला आहे, असा उल्लेख त्यांनी केला. यावेळी बोलतांना राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे म्हणाले की, दीड वर्षांपूर्वी निवडणूक लढणार नाही असे सांगितले होते. सामाजिक जीवनात जे काम मिळेल ते करणार अस सांगितले. मात्र ध्यानीमनी नसताना अचानक राजस्थान राज्याचा राज्यपाल झालो. फुलंब्री मतदारांमध्ये जलसंधारण, रस्ते विकासाचे काम केले. अनेक कामे मार्गी लावण्याचा प्रयत्न केला आहे. उर्वरित कामेही लवकरच मार्गी लागतील, असे ते म्हणाले. मंत्री अतुल सावे म्हणाले, श्री. बागडे यांनी प्रत्येक क्षेत्रात समर्पित भावनेने कार्य केले आहे. वृत्तपत्र वाटपापासून सुरू झालेला त्यांचा प्रवास आहे. आज सहकार तसेच सामाजिक कार्यात त्यांचे योगदान महत्वपूर्ण आहे. राष्ट्र प्रथम व शेवटी मी अशी भावना ठेवून त्यांनी काम केले आहे. सहकारी साखर कारखाना, देवगिरी बँक अडचणीत असताना आपल्या व्यवस्थापनाने त्यांनी अडचणीतून मार्ग काढला आहे. त्यासोबतच फुलंब्री तालुक्यात 'कोल्हापूरी बंधाऱ्याचा पॅटर्न' त्यांनी रूजविला आहे. राज्यपाल श्री. बागडे यांचे कार्य आपल्यासाठी कायम मार्गदर्शक राहिले आहे. माजी केंद्रीय मंत्री डॉ.भागवत कराड यांनी श्री. बागडे यांच्या मार्गदर्शनाचा उल्लेख केला. श्री.हरिभाऊ बागडे यांनी सहकार, शिक्षण, क्षेत्रात मोठे काम उभे केले आहे. सातत्य सेवाभाव, सुनियोजन, सांघिक वृत्ती, सहनशिलता, स्वच्छ प्रतिमा या सर्व गोष्टी त्यांच्यात आहेत त्यामुळेच कार्यकर्ता ते राज्यपाल असा त्यांचा प्रवास आपल्या सर्वांसमोर आदर्श ठरणारा आहे, असे माजी केंद्रीय मंत्री डॉ.भागवत कराड यांनी सांगितले. माजी मंत्री राजेंद्र दर्डा म्हणाले, श्री. बागडे यांनी आपल्या आयुष्यात जास्तीत जास्त समाजकारण केले आहे. आपल्या प्रत्येक कार्यातून त्यांनी ते दाखुन दिले आहे. निस्वार्थी कार्याचा हा गौरव समारंभ आहे. श्री. बागडे यांची कारकीर्द नवीन पिढीला प्रेरणा देणारी आहे. 'माझा प्रवास' या श्री. बागडे यांच्या जीवन प्रवासावरील पुस्तकाचे प्रकाशन यावेळी करण्यात आले. श्री. रमेश पतंगे यांनी पुस्तकाविषयी माहिती दिली. पुणे सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता व किनगाव सुपुत्र श्री. अतुल चव्हाण यांनी प्रमाणपत्रावरील मजकुराचे वाचन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मानसी सोनटक्के यांनी केले. यावेळी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त

### लँड हिअर' मोहीम सुरू

मुंबई : जर्मनीच्या बाडेन-वुर्टेम्बर्ग राज्याने आपली 'लँड हिअर' ही मोहीम महाराष्ट्रात सुरू केली आहे. बाडेन-वुर्टेम्बर्ग हे जर्मनीतील वायव्येकडील राज्य चैतन्यशील, भक्कम आर्थिक पायावर उभे असलेले आणि सुंदर नैसर्गिक देखावे व सक्रिय सांस्कृतिक जीवन यांनी समृद्ध असून तेथे महाराष्ट्रातील कुशल कामगारांना आकर्षित करुन विविध रोजगार संधी देणे, हे या मोहिमेमागील उद्दिष्ट आहे. महाराष्ट्र व बाडेन-वुर्टेम्बर्ग या दोन राज्यांतील गेल्या अनेक दशकांच्या सहकार्यावर आधारित ही मोहीम परस्पर संबंध अधिक भक्कम करेलच, परंतु जर्मनीतील कुशल कामगारांच्या वाढत्या गरजेचीही पूर्तता करेल.

### पीएनजी ज्वेलर्स तर्फे नवीन दालनांचे उद्घाटन

छत्रपति संभाजीनगर : परंपरा,संस्कृती आणि विस्ताराच्या महत्त्वपूर्ण प्रवासात शुध्दता,वचनबध्दता,महाराष्ट्रीयन परंपरा जपणारा आणि १९२ वर्षांचा समृध्द वारसा आणि उत्कृष्टतेची बांधिलकी असलेल्या पीएनजी ज्वेलर्स तर्फे नवरात्रीनिमित्त संपूर्ण महाराष्ट्रात नवीन ९ दालने सुरू करण्यात येणार आहेत.प्रत्येक समारंभासाठी सोने,नैसर्गिक हिरे,प्लॅटिनम व चांदीच्या बनावटींमधील अंगठ्या,कानातले,ब्रेसलेटसह २५०० ते ६५०० चौरस फूट आकाराच्या प्रत्येक दालनात आभूषणांची विस्तृत श्रेणी उपलब्ध करण्यात येणार आहे.

### आईकू ने या सणासुदीच्या हंगामात कमाल ऑफरची घोषणा केली

नवी दिल्ली: आईकू , उच्च-कार्यक्षमता स्मार्टफोन ब्रँड, त्याच्या ग्राहकांना सातत्याने उच्च कार्यक्षमतेची क्षमता प्रदान करून झेड सिरीज, निओ सिरीज आणि फ्लॅगशिप मॉडेल्ससह त्याच्या उत्पादन लाइनअपमध्ये ॲमेझॉनवर प्रथम क्रमांकाचा बेस्टसेलर म्हणून प्रस्थापित झाला आहे. . या सणासुदीच्या हंगामात, आईकू त्याच्या काही सर्वाधिक विकल्या जाणाऱ्या मॉडेल्सवर उत्तम सौदे ऑफर करत आहे, ज्यात आईकू ज़ेड९एस मालिका, आईकू ज़ेड ९ लाइट ५जी, आईकू ड९एक्स ५जी, आईकू नियो ९ प्रो, आईकू १२ ५जी आणि आईकू टीडब्ल्यूएस १ईयांचा समावेश आहे. २७ सप्टेंबर २०२४ पासून सुरू होणाऱ्या अमेज़न ग्रेट इंडियन फेस्टिव्हलदरम्यान या खास ऑफर उपलब्ध असतील.

### सोनी सबवरील वंशज' मालिकेची सांगता होणार

मुंबई : सोनी सबवरील वंशज २८सप्टेंबर रोजी प्रेक्षकांचा निरोप घेणार आहे. महाजन साम्राज्याच्या दोन लढाऊ वंशजांच्या भूमिकेत अंजली तत्रारी आणि माहिर पांधी यांनीमालिकेत वारसा विरुद्ध लिंग-आधारित वारसा या मूल्यावर प्रकाश टाकून प्रेक्षकांना आपलेसे केले. उत्कंठावर्धक वळण, बदल आणि आणखी एका व्यावसायिक प्रतिस्पर्ध्याच्या प्रवेशासह मालिकेने प्रेक्षकांची मने जिंकली.

यामुळे ही मालिका चाहत्यांच्या पसंतीस उतरली. शेवटपर्यंत मालिकेचा प्रेक्षक वर्ग तसाच टिकून राहिला. या आठवड्यात ही मालिका संपणार आहे. योग्य वारस शोधण्यासाठी युविका (अंजली तत्रारी) आणि डीजे (माहिर पंधी) यांनी जोरदार लढत दिली.ही मालिका संपत असल्याने मालिकेतील कलाकारांनी त्यांच्या आठवणींना उजाळा करून देत कृतज्ञता व्यक्त केली. असे करताना सर्वच कलाकारहे भावनिक झाल्याचे पहायला मिळाले.

## दिग्दर्शक संदीप सावंत यांचा नवा चित्रपट भेटीला 'ह्या गोष्टीला नावच नाही'

छत्रपती संभाजी नगर : कथाविषयाची उत्तम जाण, माध्यमांवरील योग्य पकड यामुळे दिग्दर्शक संदीप सावंत यांची प्रत्येक दिग्दर्शकीय कलाकृती वेगळी ठरली आहे. स्वत:ला पडलेले प्रश्न, आजबाजूच्या समस्या दिग्दर्शक संदीप सावंत यांनी आपल्या सिनेमांतून आजवर अत्यंत प्रभावी-पणे मांडल्या आहेत. 'श्वास, 'नदी वाहते' यासारख्या चित्रपटांमधून चित्रभाषेची प्रगल्भ समज दिग्दर्शक संदीप सावंत यांनी या आधीच दाखवून दिली आहे. मराठी चित्रपट फक्त मनोरंजनातच न अडकता, जगण्यासाठीची प्रेरणा देण्याचे कामही तेवढ्याच ताकदीने आजवर करत आला आहे. एक-दोन नव्हे तर अशा अनेक चित्रपटांची समृद्ध मालिकाच मराठी सिनेसृष्टीने गुंफली आहे. याच मालिकेत दिग्दर्शक संदीप सावंत 'ह्या गोष्टीला नावच नाही' या नव्या चित्रपटाच्या माध्यमातून एक सुंदर पुष्प ओवण्याचा प्रयत्न केला आहे. येत्या ८ नोव्हेंबरला पॅनोरमा स्टुडिओज प्रस्तुत 'ह्या गोष्टीला नावच नाही' चित्रपट सर्वत्र प्रदर्शित होणार आहे.

डॉ.सतीशकुमार आदगोंडा पाटील यांच्या 'मृत्यूस्पर्श' या कादंबरीवर आधारित हा चित्रपट आहे. प्रतिकूल परिस्थितीत जगण्याचं बाळकडू कोणालाच मिळालेलं नसतं, पण कठीण परिस्थितीत माणूस असीम जिद्दीचे तोरण बांधून त्या संकटांवर मात करतो. प्रत्येकाच्या आयुष्यात असे अनेक प्रसंग येतात, ज्यामध्ये माणसाच्या धैर्याची, चिकाटीची परीक्षा होते. 'ह्या गोष्टीला नावच नाही' या चित्रपटातूनही नैराश्याच्या गर्तेत सापडलेला नायक मुकुंद आपल्या कुटुंबाच्या मदतीने जगण्याला कसा आत्मविश्वासाने सामोरा जातो याची प्रेरणादायी कथा पहायला मिळणार आहे. जयदीप कोडोलीकर, प्रथमेश अत्रे, चैतन्य जवळगेकर, अनुराधा धामणे,अवधूत पोतदार, सीमा मकोटे, प्रतीक्षा खासनीस आदि कलाकार या चित्रपटात दिसणार आहेत. ागण्यापेक्षा आपल्या प्रिय व्यक्तीला दुःखात, त्रासात बघणं हे अधिक दुःखदायक असतं, अशावेळी आपलं जीवन अधिक सुंदर करण्याचं सामर्थ्य आत्मसात करणं गरजेचं असतं, हेच या चित्रपटातून सांगण्याचा प्रयत्न केल्याचे दिग्दर्शक संदीप सावंत सांगतात.

## विदेशी पर्यटकांचा सत्कार करून जागतिक पर्यटन दिन साजरा



**तभा वृत्तसेवा**
**फर्दापूर दि.२७**

संयुक्त राष्ट्राच्या जागतिक पर्यटन संस्थेने जाहीर केल्यानुसार २७ सप्टेंबर हा दिवस जागतिक पर्यटन दिवस म्हणून जगभर साजरा करण्यात येतो.जगभरात पर्यटनाविषयी जनजागृती व्हावी या उद्देशाने हा दिवस साजरा करण्यास सुरुवात केली आहे.यापार्श्वभूमीवर पर्यटन दिनाचे औचित्य साधत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळातर्फे फर्दापूर येथील पर्यटक निवास कॉन्फरन्स हॉलमध्ये रशिया येथील विदेशी पाहुण्यांच्या उपस्थितीत जागतिक पर्यटन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

जागतिक पर्यटन दिन २०२४ पर्यटन आणि शांतता या थीम अंतर्गत राष्ट्रे व संस्कृतीमधील शांतता व समजुदारपणा आणि सलोखा इत्यादी प्रक्रियांना पाठिंबा देण्यासाठी या क्षेत्राची महत्त्वपूर्ण भूमिका अधोरेखित करण्याचा या मुख्य उद्देश आहे. गेल्या १५ वर्षाहून अधिक काळ युफॉलॉजी व प्राचीन सभ्यतेच्या जागतिक वारसा स्थळांचा अभ्यास करणारे प्रमुख वक्ते डॉ.व्हॅलेरी उवारोव यांनी रशियन भाषेवर प्रभुत्व असणारे त्यांचे गाईड जितेंद्र सिंग यांच्या माध्यमातून उपस्थितांशी संवाद साधला.मनोगत व्यक्त करतांना ते म्हणाले की १९९३ साली मी सर्वप्रथम भारतात आलो.त्यावेळी मला गांधी परिवारातील सदस्यांनी दिल्ली येथे येण्याचे निमंत्रण दिले होते.त्यावेळी मी दिल्ली ते बेंगलोर स्वतः गाडी चालवत प्रवास केला होता.जगाला हेवा वाटेल अशी भारतीय संस्कृती व येथील लोक आहेत.मी मागील काळात भरपूर देश फिरलो असून तेथील जागतिक वारसा स्थळांचा अभ्यासही केला आहे.मात्र मला जगातील वारसा स्थळां पैकी अजिंठा लेणी सारखे शिल्प इतर देशात मला आढळून आले नाही.त्यामुळे मला अजिंठा लेणी विषयी विशेष प्रेम आहे.मी आणि माझी पत्नी ओल्गा वर्षातून दोन ते तीन वेळा रशियन पर्यटकांना अजिंठा लेणी बघण्यासाठी आवर्जून घेऊन येत असतो.आगामी काळात अजिंठा लेणीवर चित्रपट व पुस्तक प्रकाशित करण्याचा माझा मानस आहे.यावेळी उपस्थित रशियन पर्यटक व उपस्थितांचे महाराष्ट्र पर्यटक विकास महामंडळातर्फे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व्यवस्थापक राज पाटील यांनी केले.यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रफुल्ल साबळे,योगेश बळे शुभम खंडारे,उपसरपंच फिरोज पठाण,शॉपिंग प्लाझा संघटनेचे विलास वराडे,गाइड सारंग देशमुख,अजंता टुरिझम डेव्हलपमेंट क्लस्टरचे अध्यक्ष संजय सोनवणे,मेहबूब पठाण,इम्रान शाह,पर्यटन व्यावसायीक,महामंडळ कर्मचारी शिवाजी पावरा,दिपक नरोटे, सलीम शेख, वसंत चौधरी, ज्ञानेश्वर नरोटे,जोतमल चव्हाण, दुर्योधन, सुरेश चव्हाण, निलेश, विकास देठे उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त...

### सेलूत ब्राम्हण समाजाचा आनंदोत्सव

**सेलू,/प्रतिनिधी:** सेलूत ब्राम्हण समाजाचा आनंदोत्सव श्री.परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन राज्यातील महायुती सरकारने काल पार पडलेल्या कॅबिनेट बैठकीत ब्राह्मण समाजासाठी स्वतंत्र श्री.भगवान परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन केले. अनेक दिवसांपासूनचा ब्राह्मण समाजाच्या जिव्हाळ्याचा प्रश्न शासनाने मार्गी लावला. या निर्णयाबद्दल महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री.एकनाथ शिंदे ,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ,उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे ही आभार मानण्यात आले.सेलू येथील ब्राह्मण समाज व श्री.भगवान परशुराम जन्मोत्सव समितीच्या वतीने लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून,पेढे वाटून व फटाके फोडून आनंद उत्सव साजरा केला. यावेळी सेलूतील सर्व समाज बांधव उपस्थित होते.

### मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत मेळाव्याचे आयोजन

**परभणी,/प्रतिनिधी:** मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये मुख्यमंत्री युवा मेळाव्याचे आयोजन दि. ३० सप्टेंबर, २०२४ रोजी सकाळी १० वाजता करण्यात आले आहे. याअंतर्गत १२ उत्तीर्ण, पदविका/डिप्लोमा, पदवीधारक उमेदवारांना या योजनेत सहा महिन्याकरीता पात्र उमेदवारांची निवड करण्यात येत असून त्यांना १२ वी उत्तीर्ण उमेदवारांना ६ हजार, पदविका/डिप्लोमा उत्तीर्ण उमेदवारांना ८ हजार आणि पदवीधारक उत्तीर्ण उमेदवारांना १० हजार प्रति महा मानधन देण्यात येणार आहे. तरी जास्तीत जास्त आस्थापनांनी (शासकीय/अशासकीय) या मेळाव्यास उपस्थित नोंदवावी तसेच सदर मेळाव्यास पात्र उमेदवारांनी हजेरी नोंदवून संधीचा लाभ घेण्याचे आव्हान औद्यिगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य विकास आडे यांनी केले आहे.

### खरीप २०२३ मधील कापुस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना ई-केवायसी करण्याचे आवाहन

**परभणी,/प्रतिनिधी:** राज्यातील सन २०२३ च्या खरीप हंगामामध्ये ई-पीक ॲप/पोर्टलद्वारे कापुस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांनी लागवडीची नोंद केली आहे अशा नोंदणीकृत पात्र लाभार्थी शेतकऱ्यांना ०.२० हेक्टर पेक्षा कमी क्षेत्रासाठी सरसकट रु १ हजार आणि ०.२० हेक्टर पेक्षा जास्त क्षेत्रासाठी त्यांच्या क्षेत्रानुसार प्रती हेक्टर रु ५ हजार (२ हेक्टरच्या मर्यादेत) अर्थ सहाय्य देण्यात येणार आहे. त्याकरिता शेतकऱ्यांनी नजीकच्या सेतू सुविधा केंद्रावर जाऊन आपले ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी. ई-केवायसी यशस्वीरित्या पूर्ण केल्यावरच एकवेळ अनुदान वितरणासाठी शेतकरी पात्र ठरतील. तरी शेतकऱ्यांनी २७ सप्टेंबर, २०२४ पर्यंत ई-केवायसी प्रक्रीया पूर्ण करावी. तसेच अधिक माहितीसाठी गावचे कृषी सहाय्यक, कृषी पर्यवेक्षक, मंडळ कृषी अधिकारी किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयास संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी दौलत चव्हाण यांनी केले आहे. शेतकऱ्यांकडून प्राप्त झालेले संमतीपत्र व नाहरकत पत्र तालुका कृषी अधिकारी कार्यालयामार्फत संकलित करून शासनाने महाआयटीकडून तयार केलेल्या www.scagridbt.mahait.org.in या वेबपोर्टलवर माहिती भरली जात आहे. त्या करिता कोणत्याही मध्यस्थांच्या सहभागाशिवाय आर्थिक सहाय्य योजना पात्र लाभार्थ्यांपर्यंत त्यांच्या आधार-सीड बँक खात्यांत जमा होते याची खात्री करण्यासाठी राज्याने ई-केवायसी प्रक्रिया सुरू केली आहे.

### पूर्णेत महालोक अदालतीचे आज आयोजन

**परभणी,/प्रतिनिधी:** महालोक अदालतीचे आज आयोजन पूर्णा,प्रतिनिधी- पूर्णा येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयात शनिवारी २८ सप्टेंबर रोजी महालोकन्यालयाचे आयोजन करण्यात आले असून या लोकन्यायालयात पक्षकारांनी आपली प्रकरने मिटवून घ्यावीत असे आव्हान पूर्णा न्यायालयाच्या सहदिवाणी न्यायाधीश मेघा पौळ यांनी केले आहे.

पूर्णा तालुका वकील संघ, पूर्णा तालुका विधी सेवा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने २८ सप्टेंबर शनिवार रोजी सकाळी साडेदहा वाजता पूर्णा येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयात राष्ट्रीय लोकन्यायालयाचे आयोजन करण्यात आली असून या लोकन्यायालयात दिवाणी व फौजदारी स्वरूपाची विविध प्रकरने ठेवण्यात आली असून या लोकन्यायालयात पक्षकारांणी आपली प्रकरणे तडजोडीने मिटवून घेऊन हे लोकन्यायालय यशस्वी करण्याचे आवाहन पूर्णा न्यायालयाच्या सह दिवाणी न्यायाधीश श्रीमती मेघा पौळ यांनी केले आहे.

### राष्ट्रीय शालेय टेबल टेनिस क्रीडा स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्य टेबल टेनिस संघाची घोषणा

**परभणी,/प्रतिनिधी:** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय परभणी व परभणी जिल्हा टेबल टेनिस असोशिएशन, परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय शालेय टेबल टेनिस क्रीडा स्पर्धा. दि. २४ ते २६ सप्टेंबर २०२४ दरम्यान राज्य शालेय टेबल टेनिस क्रीडा स्पर्धा परभणी येथे संपन्न झाल्या. यातून १४/१७/१९/ वर्षे मुले/ मुली महाराष्ट्र राज्य टेबल टेनिस संघाची निवड समिती सदस्य संजय कडू(रायगड) शेख असद , अनिल बंदेल, ईश्वर कदम (पुणे) सचिन पुरी (छ.सभाजीनगर) गणेश माळवे (परभणी)अजय कांबळे (नागपूर) यांनी संघाची निवड केली. परभणी जिल्हा क्रीडा अधिकारी कविता नावंदे यांनी संघाची घोषणा केली. महाराष्ट्र राज्य संघ - १४ वर्षे मुली. नैशा रेवसकर (पुणे विभाग) आदया गवते - (पुणे विभाग) सान्वी पुराणिक (पुणे विभाग) शरयु टेकाळे (छ. संमाजीनगर) श्रेया गायकवाड (पुणे विभाग) राखीव- वरदा केजगिर (नागपूर विभाग) निरजा देशमुख (पुणे विभाग) १४ वर्षे मुले:- निवान शेठ , निलय पठ्ठेकर, रिदन वोरा (मुंबई विभाग) अनुज फुलसुंदर (पुणे विभाग) सार्थ शास्त्री (नागपूर विभागा) राखीव: अनुज कवठेकर (छ.संभाजीनगर), शर्वरी खोब्रागडे (नागपुर विभाग) देवश्री तरडे अधीक्षक रमेश खुणे, क्रीडा अधिकारी सुयश नाटकर, प्रा.प्रसेनजीत बनसोडे आदी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# निवडणूक काळात अधिकारी-कर्मचारी यांनी दक्षतेने कामे करावीत - जिल्हाधिकारी

## विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने प्रशिक्षण संपन्न

**परभणी,/प्रतिनिधी:** आगामी विधानसभा निवडणूकीच्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाकडून प्रभावीपणे पूर्वतयारी सुरू आहे. त्याअंतर्गत विविध बाबींच्या प्रशिक्षण सत्रांना सुरूवात झाली आहे. या अनुषंगाने अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी बुधवार व गुरूवारी दोन दिवसांचे प्रशिक्षण सत्र जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आले होते. विधानसभा निवडणूक यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दिलेली जबाबदारी समन्वय व दक्षतेने पार पाडावी, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी रघुनाथ गावडे यांनी दिले.

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी संपूर्ण निवडणूक प्रक्रियेचे प्रशिक्षण देण्याची सूचना मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून करण्यात आली. त्यानुसार जिल्हा निवडणूक अधिकारी रघुनाथ गावडे यांच्या मार्गदर्शनात जिल्ह्यात प्रशिक्षण सत्रांना प्रारंभ झाला आहे. या प्रशिक्षण सत्र प्रसंगी पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथूर, अपर जिल्हाधिकारी डॉ. प्रताप काळे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार, उपजिल्हा निवडणूक अधिकारी जनार्धन विधाते यांच्यासह उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, गटविकास अधिकारी, पोलीस अधिकारी आणि सर्व नोडल अधिकारी उपस्थित होते. दोन




दिवसीय प्रशिक्षण सत्रामध्ये निवडणुकीच्या प्रत्योक टप्प्याशी संबंधित प्रत्योक बाबींचे प्रशिक्षण अधिकारी व कर्मचा-यांना देण्यात आले. प्रथम दिवशी निवडणूक प्रक्रिया (अधिसूचना ते निवडणूक निकाल घोषणा) तसेच कायदा व सुव्यवस्था आणि आचारसंहिता व विविध विभागतील समन्वय याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

तर दुसऱ्या दिवशी खर्च अभिलेखे आणि निवडणूक विषयक अन्य बाबींचे सादरीकरणाव्दारे सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. नामनिर्देशन, छाननी, अर्ज मागे घेण्याची प्रक्रिया, चिन्हवाटप, मतदान पथक, मतदान केंद्रे, मतमोजणी, पोस्टल बॅलेट, आयटी ॲप्लिकेशन्स याबाबतही तज्ञ अधिकाऱ्यांनी मार्गदर्शन केले.

जिल्हाधिकारी म्हणाले की, निवडणूक कामकाजात कुठलीही चूक करु नये. निवडणूकशी संबंधित सर्व माहिती जाणून घ्यावी. प्रत्याक्ष निवडणूक जाहीर झाल्यानंतर काय करावे, याबाबत दक्ष राहावे. स्वीप कार्यक्रमातंर्गत मतदानाविषयी जनजागृती करावी.

### चुडावा मंडळ अधिकारी यांच्या मनमानी कारभाराची चौकशी करण्याची मागणी

**पूर्णा,/प्रतिनिधी-** तालुक्यातील चुडावा येथील मंडळ अधिकारी बालाजी लटपटे हे मुख्यालयास राहत नसून त्यांच्या मनमानी कारभारामुळे सर्वसामान्य जनतेची कामे होत नाहीत त्यामुळे त्यांची चौकशी करून त्यांना निलंबित करण्यात यावी अशी मागणी निवेदनाद्वारे बबनराव खंदारे यांनी केली आहे.

याबाबत तहसीलदार पूर्णा यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की चुडावा विभागाचे मंडळ अधिकारी बालाजी लटपटे हे मुख्यालयास न राहता गंगाखेड येथून जाणे येणे करून आपला कारभार चालवत असतात, ते केव्हाही आपल्या मंडळाच्या ठिकाणी उपस्थित राहत नसल्यामुळे शेतकरी,विद्यार्थी, दिव्यांग बांधव यांची विविध शासकीय कामे प्रलंबित राहत असून त्यांच्या मोबाईल पण ते बंद ठेवतात. ते नेहमी सर्वसामान्य जनतेला उद्धटपणाची वागणूक देत आहे.शेतकऱ्यांच्या शेताचे फेरफार मंजूर करण्यासाठी ही ते टाळाटाळ करून आपला मनमानी कारभार चालवत असून त्यांच्या या मनमानी कारभाराची चौकशी करून त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करावी, नसता आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा बबनराव रामराव खंदारे राहणार आहेरवाडी यांनी निवेदनद्वारे तहसीलदार पूर्णा यांच्याकडे केला आहे.

### सेलू तालुका तलाठी संघटनेच्या अध्यक्षपदी सारिका हेगडे तर सरचिटणीसपदी सुरेश बाबर यांची बिनविरोध निवड

**सेलू,/प्रतिनिधी-** तलाठी व मंडळ अधिकारी संघटना सेलू यांची विशेष बैठक माननीय जिल्हाध्यक्ष सूर्यवंशी साहेब व माजी जिल्हाध्यक्ष श्री मुकुंद आष्टीकर साहेब यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.



बैठकीस गणपूर्ती होती बैठकी दरम्यान नवीन कार्यकारणी निवड बाबत चर्चा झाली व एकमताने तालुका अध्यक्षपदी श्रीमती सारिका हेडगे यांची निवड करण्यात आली तर उपाध्यक्षपदी मोताळे , सरचिटणीस सुरेश बाबर सल्लागार माधव कुरेवाड हिशोबनीश ओम कानडे कार्याध्यक्ष भरत नखाते संघटक राधिका गरुड कोषाध्यक्ष स्वप्निल बडवे महिला प्रतिनिधी पानझाडे दीपिका गायकवाड या प्रमाणे नवीन कार्यकारणी निवड करण्या आली . पदाधिकारी निवड झाल्याच्या नंतर मंगळवार १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या औचित्या साधून उपविभागीय अधिकारी संगीता सानप मॅडम व तहसीलदार सेलू डॉक्टर शिवाजी मगर साहेब नायब तहसीलदार मोरे देशमुख यांनी नवनिर्वाचित तलाठी व मंडळ अधिकारी संघटना तालुका अध्यक्ष सारिका हेडगे यांचे व नवीन कार्यकारणी चे स्वागत केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### जिंतूर ते येलदरी रस्त्याची दुरुस्ती करावी - टाले

**जिंतूर,/प्रतिनिधी-** तालुक्यातील सर्वात मोठी बाजारपेठ असलेली येलदरी हा रस्ता जिंतूर ते येलदरी हे १५ किलो मीटर अंतर जाण्यासाठी वाहनधारकांना सुमारे एक ते दीड तास कसरत करावी लागत आहे या रस्त्यावर जागोजागी पडलेले खड्डे. या खड्ड्यामुळे अनेकांना आपला जीव गमावावा लागला व अनेकांना कायमचे अपंगत्व आलेले आहे हा रस्ता मराठवाडा ते विदर्भ जोडल्या जाणारा मुख्य रस्ता असल्यामुळे या रस्त्यावर विदर्भातील व मराठवाड्यातील अनेक गावांना जाण्यासाठी हा मुख्य रस्ता असल्यामुळे या रस्त्यावर १५ किलोमीटरवर सुमारे मोजता येणार नाहीत इतके खड्डे पडलेले आहेत या खड्ड्यामुळे अनेक वाहनांना आपले वाहन कसे चालवावे कसे नाही हा मात्र मोठा प्रश्न उपस्थित होत आहे.



वाहनधारकांचे या खड्ड्यामुळे अनेक वाहने खड्ड्यामुळे जागोजागी बंद पडत आहेत अनेकांचे वाहनांची एक एक पार्ट निकामी होत आहेत या रस्त्यावरील खड्ड्यामुळे दोन ते तीन दिवसांपूर्वी एक अपघात झाला त्या अपघातामध्ये २७ वर्षीय तरुण खड्डा चुकवित आणि आपला जीव गमवावा लागला सार्वजनिक बांधकाम उपविभाग जिंतूर हे मात्र या रस्त्याकडे दुर्लक्ष करीत आहे हा रस्ता शासनाने लाखो रुपये खर्च करून एक ते दोन वर्षांपूर्वी पूर्ण हॉट मिक्स करण्यात आलेला आहे परंतु गुत्तेदाराने या कामाची क्वालिटी चे काम न करता अत्यांत निकृष्ट दर्जाचे काम केले आहे त्यामुळे शासनाने लाखो रुपये खर्च करून हा खर्च मात्र भुईसपाट झाला आहे शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे या रस्त्यावरील अपघाताचे प्रमाण वाढतच चालले आहे हा रस्ता तुरित दुरुस्त करावा अशा मागणीचे निवेदन उद्धव बाळासाहेब गटाच्या शिवसेनेच्या महिला जिल्हा संघटक सुरेखाताई शेवाळे टाले यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री तथा बांधकाम मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री आणि विधानसभेतील विरोधी पक्ष नेते अंबादास रावजी दानवे साहेब यांच्याकडे देण्यात आले आहे हा रस्ता तुरित दुरुस्त करावा अन्यथा शिवसेना स्टाईलने आंदोलन करण्यात येईल अशी मागणी त्यांनी एका निवेदनाद्वारे केली आहे.

### तडजोड युक्त प्रकरणांचा लोकन्यायालयात निपटारा करावा - मुंडे

**सोनपेठ,/प्रतिनिधी-** महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, परभणी यांच्या आदेशान्वये तालुका विधी सेवा समिती, व वकील संघ, सोनपेठ यांच्या संयुक्त विदयमाने शनिवार दिनांक २८ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी दिवाणी न्यायालय सोनपेठ येथे राष्ट्रीय लोकन्यायालयाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या लोक अदालती मध्ये सहभागी होऊन जास्तीत जास्त तडजोड युक्त प्रकरणांचा निपटारा करावा असे आवाहन सोनपेठ येथील न्यायाधीश एस.व्हि.मुंडे यांनी एका प्रसिध्दी पत्राकाद्वारे केले आहे.

राष्ट्रीय लोकन्यायालयात तडजोडीस पात्रयुक्त असलेले फौजदारी प्रकरणे, दिवाणी प्रकरणे तसेच घटस्फोट वगळता कौटुंबिक वाद असलेली प्रकरणे, १३८ एन.आय. ॲक्ट ईत्यादी दाखल प्रकरणे तसेच विविध बँक व फायनान्सची थकीत कर्ज वसुली वादपुर्व प्रकरणे, नगर परिषद हद्दीतील घरपट्टी व पाणीपट्टी, पंचायत समिती, सोनपेठ अंतर्गत ग्रामपंचायत स्तरावरील घरपट्टी व पाणी पट्टी यांची वाद दाखल पुर्व प्रकरणे आपसांत तडजोड करणेकरिता ठेवण्यात येणार आहेत. लोकअदालतीच्या माध्यमातून खटले निकाली काढल्यास वेळेची व पैशाची बचत होते. तरी सर्व संबंधीत पक्षकार व नागरिकांनी वरिल प्रकारची आपली प्रकरणे आपसांत तडजोड करण्यासाठी दि. २८ सप्टेंबर २०२४, शनिवार रोजी दिवाणी व फौजदारी न्यायालय, सोनपेठ येथे सकाळी १०.३० वाजता हजर रहावे व या राष्ट्रीय लोकअदालतीचा लाभ घ्यावा असे आवाहन सोनपेठ न्यायालयाचे न्यायाधीश संतोष व्ही. मुंडे यांनी केले आहे.

### निवेदन देताच नगरपरिषद लागली कामाला

**जिंतूर,/प्रतिनिधी-** जिंतूर ते संभाजी रोडवर घाणीचे साम्राज्य असल्यामुळे शिवसेनेचे शहर प्रमुख पांडुरंग घुसळे यांनी नगरपरिषद ला निवेदन देताच व तरुण भारतला बातमी लागतात नगरपरिषद चे मुख्य अधिकारी यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना आदेश देऊन जिंतूर ते संभाजी नगर रोडवर बलसा फाट्याच्या समोर असलेली घाण या



घाणीमुळे येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना व आजूबाजूच्या नागरिकांना त्या घाणीमुळे अत्यांत त्रास होत होता त्यामुळे जिंतूर ते संभाजी नगर रोडवर जाणाऱ्या येणाऱ्या प्रवाशांना सुद्धा या घाणीचा वास मुळे त्स्त्रा होत होते त्यामुळे एकनाथ भाई शिंदे गटाचे शिवसेना शहर प्रमुख पांडुरंग घुसळे यांच्या ही बाब लक्षात येताच त्यांनी तात्काळ नगरपरिषद ला निवेदन देऊन नगरपरिषद चे कर्मचारी यांच्याशी चर्चा करून तात्काळ ही घाण उचलण्यास असे निवेदन दिले या निवेदनाची दखल घेऊन व तरुण भारतची बातमी लागतात नगरपरिषद चे कर्मचारी अत्यांत जोमाने कामाला लागले व आज ती घाण प्रतीक्षात उचलण्यास सुरुवात केली आहे यामुळे येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना ही घाण उचलल्यामुळे होणारा त्रास कमी झाला व नागरिकांमध्ये समाधानी चे वातावरण निर्माण झाले आहे.

### सीआरएसने ईडीच्या तपासादरम्यान ज्ञानराधा को-ऑप बंद करण्याचे आदेश

**जिंतूर,/प्रतिनिधी:** तत्काळ कारवाई करत, केंद्रीय सहकारी संस्थांचे निबंधक () रवींद्र अग्रवाल यांनी महाराष्ट्रस्थित ज्ञानराधा बहु-राज्य सहकारी संस्था बंद करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे आणि सोमवारी याबाबतचा आदेश जारी केला आहे.

नुकतिच या संबंधी जिंतूर -सेलु विधानसभा मतदारसंघाच्या आमदार मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी केंद्रीय सहकार व नागरी उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची नवी दिल्लीत ठेवीदारांच्या शिष्टमंडळासह भेट घेतली होती.त्यानंतर मा.मंत्री महोदय यांनी संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेऊन कारवाई करणे साठी त्यांना आदेश दिला होता सदर आदेशात असे नमूद आहे की अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) यापूर्वी दिल्ली, जळगाव आणि अहमदाबाद येथे ज्ञानराधा मल्टी-स्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड (डीएमसीएसएल), सुरेश कुटे आणि इतरांच्या तपासाचा एक भाग



म्हणून शोध मोहीम राबवून जंगम मालमत्ता गोठवली होती. अंदाजे ७.५ कोटी रुपये आहे. आदेशात, सीआरसीएसने म्हटले आहे की, ''सोसायटी एमएससीएस कायदा, २००२ आणि त्याच्या मंजूर उपनियमांनुसार कार्यरत नाही. त्यानुसार, एमएससीएस कायदा, २००२ च्या तरतुदींनुसार समाप्ती प्रक्रिया सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे,''.

TARUN BHART 28 SPT 1 NO NEW.:Copy of Layout 1 27-Sep-24 7:21 PM Page 1



भास्कर दानवे यांच्या प्रयत्नांचे फलित

# जालना विधानसभा क्षेत्रात यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेअंतर्गत ५२० घरकुलांना मंजुरी

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेंतर्गत जालना जिल्हयातील ५१८० वैयक्तिक घरकुल लाभार्थ्यांच्या प्रस्तावास कार्योत्तर मान्यता व निधी उपलब्ध करुन देण्याबाबत नुकताच शासनाने निर्णय दिला आहे, यामध्ये जालना विधानसभा (१०१) क्षेत्रातील विमुक्त जाती व भटक्या जमाती समाजातील लाभार्थ्यांना हक्काचे घर मिळवून देण्यासाठी मा केंद्रिय राज्यमंत्री मा.श्री. रावसाहेब पाटील दानवे यांच्या विशेष प्रयत्नाने तसेच जालना विधानसभा प्रमुख भास्कर



(आबा) दानवे यांनी वारंवार पाठपुरावा करुन विधानसभा क्षेत्रातील वाघ्रूळ, बाजीउम्रद तांडा, सावंगी तलाव, दहीफळ, पिरपिंपळगांव, साळेगांव नेर, बठाण बु., पारेगांव, सामनगांव, धावेडी, वखारी वडगांव, निरखेडा तांडा, नंदापूर, घाणेवाडी, गवळी पोखरी, गोंदेगांव, वडगांव (वखारी) ,पानशेंद्रा, पाहेगांव, वरखेड सिं. , मजरेवाडी, वरुड, देवमुर्ती, मानेगांव जहागिर या गावांमधील एकूण ५२० लाभार्थ्यांना घरकुल मंजूर झा- लेले असून यामुळे लाभार्थ्यांमध्ये आनंदाची लाट पसरली आहे.विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या लोकांना विकासाच्या मूळ प्रवाहात आणणे, त्यांचे राहणीमान उंचावे, त्यांचे उत्पन्न स्त्रोत वाढावे, त्यांना स्थिरता प्राप्त करून देणे. यासाठी त्यांना जमीन उपलब्ध करून तेथे वसाहत उभी करून देणे व त्या ठिकाणी त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण बनविणे हे या योजनेचे मुख्य उद्दिष्ट आहे.

यावेळी गावकऱ्यांनी भास्कर आबांचा सत्कार करुन समस्त गावकऱ्यांच्या वतीने आभार मानले. या प्रसंगी भाजप जिल्हा सरचिटणीस सिद्धिविनायकजी मुळे, मुकेश चव्हाण, बद्रीनाथ वाघ, संजय डोंगरे, कृष्णा गायके, नागेश अंभोरे, दीपक पाडूळ, विष्णु राठोड, सुमित सुराडकर, यांच्यासह अनेक भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते उप- स्थित होते.

# अतिवृष्टी मुळे शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान, हाती आलेली पिके जमीनदोस्त





**तभा वृत्तसेवा**
**जाफराबाद/प्रतिनिधी**

निसर्गाचा लहरीपणाने शेतकरी देशोधडीला लागला असून कधी अवकाळी, गारपीट, तर दुष्काळी परिस्थिती अशा या ना त्या परिस्थितीचा सामना शेतकऱ्यांना करावा लागत आहे. काल- परवाप- ासून जाफराबाद तालुक्यात धो -धो पाऊस पडत आहे. पावसाने सुकायला लागलेल्या कपाशीच्या पिकाला जीवदान मिळाले असले तरी सोंगणीला आलेले सोयाबीन भिजल्याने परिसरातील शेतकऱ्यांचे पुरते कंबरडे मोडले आहे. त्यामुळे सोयाबीन पिकाचा तोंडाशी आलेला घास या परतीच्या पावसाने हिरावून घेतल्याने शेतकरी हवालदिल झालेला दिसत आहे.

आजच्या परिस्थितीमध्ये कपाशीची बोंडे अति पावसामुळे सडु लागल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे.

जाफराबाद परिसरात मागील अनेक दिवसांपासून पावसाने उघडीप दिल्याने सध्या कपाशीचे पीक सुकू लागले होते. दुसरीकडे पावसाचा अंदाज वर्तवल्याने शेतकऱ्यांनी सोयाबीन सोंगणीची घाई करत, अनेकांनी काढणीला न आलेली सोयाबीनही सोंगणी केली होती. त्यातच बुधवारी गुरुवारी देखील धो धो पाऊस पडल्याने शेतातून सोंगलेले सोयाबीनचे पीक पाण्यात तरंगू लागले. यामुळे निसर्ग जगु देईना व मायबाप सरकार शेतकऱ्याकडे बघेना अशी अवस्था झालेली दिसत आहे.

अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान:पावसाने झालेल्या पिकांच्या नुकसानीचे त्वरित पंचनामे करायल हावे पावसाने झालेल्या पिकांच्या नुकसानीचे त्वरित पंचनामे करा, जाफ्राबाद तालुक्यात २५ ते २६ सप्टेंबर रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे शेती पिकांचे मोठे नुकसान झाले. ऐन सणासुदीच्या तोंडावर हाताशी आलेली पिके पाण्याखाली गेली आहेत. अनेक भागातील सोयाबीन, कांदा, कांदा रोपे, मका, कपाशी या सारख्या पिकांचे नुकसान होण्याची परीस्थिती ओढवली आहे . काही ठिकाणीतर नागरिकांच्या घरात पाणी शिरले होते. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे .

पंचनामे, पीकविमा आणि इतर किचकट प्रक्रिया या शेतकऱ्यांना मदत मिळण्यासाठी नंतर अडचणीच्या ठरतात. त्यामुळे पंचनामे वेळीच झाले, तरच नुकसान झालेली तीव्रता मांडली जाते. मागील अतिवृष्टीच्या काळात अनेक शेतकरी अद्यापही नुकसान भरपाई मिळण्यापासून वंचित आहेत. त्यातच हे पुन्हा दुहेरी संकट आल्याने शेतकरी संकटात सापडला आहे. तहसीलदार डॉ.भगत मॅडम यांनी तीव्रता आणि उद्धवलेली परिस्थितीची पाहणी करून त्यावर कार्यवाही करावी. सरकारी पथकाने नुकसानीचा अहवाल पाठवत शासनाला तत्काळ वस्तुस्थिती निदर्शनास आणून द्यावी. यापूर्वीचा अनुभव कटू असल्याने शेतकऱ्यांना होणाऱ्या नुकसानीच्या तुलनेत भरपाई मिळाली नाही, यावर देखील लक्ष देऊन पंचनामे करताना काळजीपूर्वक करावे, अशी व्यथा यावेळी शेतकऱ्यांनी व्यक्त य केली. आम्ही देखील अतिवृष्टीच्या मदतीचे परिमाण लावताना शासनाला तीव्रता निदर्शनास आणून देणार आहोत. सर्वत्र नुकसान अधिक असल्याने सरसकट पंचनामे करून घेण्याची गरज आहे. या संकट काळात तातडीने मागील प्रलंबित पीकविमा रक्कम शेतकऱ्यांना प्राप्त झालेली नाही. त्यावरही कार्यवाही व्हावी. अशी अपेक्षा.

अतिवृष्टीमुळे सिपोरा सर्कल मध्ये अनेक सोलर पॅनला तडा गेला असुन अनेक शेतकऱ्यांनचे लाखो रुपयाच नुसकान झालेल आहेमाणिकराव व्यंकट अंभोरे गजानन भिकाजी अंभोरे फुलबाई विनायक तरमळे रा सिपोरा अ . तालुका जाफराबाद

## संक्षिप्त

### मंठा शहर व परिसरामध्ये अवैद्य खुल्या मुरूमाची तस्करी

**महसूल अधिकाऱ्याच्या आशीर्वादाने दिवसरात्र सुरू**

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

मंठा शहरा सह परिसरात मुरूम अवैध चोरीला उत आला आहे. खुलेआम उंबरखेडा मुरूमखेडा पांगरी या परिसरातील गारपीआरचा माळ म्हणून प्रसिद्ध असलेल्या ठिकाणावरून दिवस रात्र मुरूम तस्करी केली जात आहे. परंतु महसूल विभागाच्या दुर्लक्षामुळे या माफियांचा जोर वाढतच चाला आहे. त्यामुळे आता ठोस कारवाईचीच गरज आहे. उंबरखेडा जवळील गारपीर परिसर नैसर्गिक वनसंपदेने नटलेले आहे. येथील माळावरून मोठ्या प्रमाणात माळावरून मुरूम महसूलच्या काही कर्मचाऱ्यांशी संगनमत करून व तहसीलदार यांच्या आशीर्वादाने अवैध मुरूम उपसा उपसा होत आहे. वरिष्ठ अधिकारी धृतराष्ट बनल्याचे दिसून येत आहे.

कोट्यावधीचा मुरूम अवैद्य मार्गाने वाहतूक केली जात आहे. याची तक्रार कोणी करण्यास गेल्यास मुरूम माफियाचे फंटर त्यांना मारहाण करून खोटे गुन्हे दाखल करतात. मंठा शहरासह तालुक्यात मुरूम चोरीवर व रेतीचे उत्खनन सुरूअसल्यामुळे मुरूम व रेती माफियांचा जोर वाढत आहे. मंठा शहरात खुलेआम मुरुमाची तस्करी दिवसाढवळ्या, रात्री-बेरात्र सुरु आहे. परिसरातील पदाधिकारी दुर्लक्ष करीत असल्यानेच मुरुमाची अवैध वाहतूक सुरू आहे. पण या वाहतुकीला आळा घालण्यासाठी कुणीच पुढाकार घेत नाही. सदर अवैध वाहतुकीबाबद तहसीलदारांना माहिती दिल्यावर ते कारवाई करू म्हणतात, मात्र काहीच करीत नाही. परिसरामध्ये तलाठी व मंडळ अधिकारी कोणते काम करतात, हे कळतच नाही. कधी- कधी तर कार्यालय बंदच दिसतो, असे नागरिक सांगतात. या सर्व बाबींना तहसील कार्यालयाचे अधिकारी जबाबदार आहे. त्यांचे कर्मचाऱ्यांवर वचक नसल्यामुळे प्रशासकीय कामात अनागोंदी कारभार सुरु दिसतो.मुरुमाचे अवैध उत्खनन जेसीबी व मजुरांच्या सहकार्यातून केले जात आहे. मुरूमाचे अवैध उत्खनन व वाहतूक तत्काळ बंद करण्यात यावी, उत्खनन होण्याऱ्या स्थळांची पाहणी करण्यात यावी व चौकशी करुन शासकीय नियमानुसार जिल्हाधिकारी यांनी दंडात्मक कारवाई करावी, अशी परिसरातील नागरिकांची मागणी आहे.

### कुणबी दाखले टिकणार नाही – मंगेश ससाणे : अंतरवाली येथे नवव्या दिवशी उपोषण स्थगित



**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**

अंबड वडीगोद्री दि २६ 'ओबीसी आरक्षण बचाव' साठी सोनियानगर अंतरवाली सराटी, ता. अंबड येथे मंगेश ससाणे व सहकाऱ्यांनी उपोषण सुरू केले होते. मुलांच्या हस्ते पाणी घेत त्यांनी गुरुवारी नवव्या दिवशी उपोषण मागे घेतले. सरकारने वाटप केलेले कुणबी दाखले न्यायालयात टिकणार नाहीत, असे ससाणे म्हणाले.

मंगेश ससाणे यांच्यासह बाबासाहेब बटुळे, संतोष वीरकर, बाळासाहेब दखणे, शरद राठोड, प्रा. विठ्ठल तळेकर यांनी १८ सप्टेंबरपासून उपोषण सुरू केले होते. उपोषण स्थगित केल्यावर ससाणे म्हणाले, 'राज्यात वर्षभरापासून दहशतवाद, शिवराळ भाषा सुरू होती. ओबीसींचे आरक्षण संपविण्याचे काम होत आहे. त्या प्रत्युत्तरासाठी ओबीसी एक झाला सोनियानगर अंतरवाली सराटी येथे गुरुवारी उपोषण सोडताना मंगेश ससाणे व सहकारी. आहे. आम्ही उपोषणाला उपोषण करून उत्तर दिले.''ओबीसी आरक्षण बचाव साठी या भागात दोन उपोषणे झाली. त्यामुळे गॅझेट लागू करण्यापासून सरकारला रोखले, असा दावा करून, सरकारने राज्यात वाटप केलेले कुणबी दाखले न्यायालयात टिकणार नाहीत. सरकारसह मनोज जरांगे यांनी हे दाखले टिकवून दाखवावेत, असे मनोज जरांगे यांनी यापुढे अंतरवाली सराटीतील मारुती मंदिर परिसरात उपोषण केले तर आम्ही या गावातील विठ्ठल-रखुमाई मंदिरात ओबीसीचे उपोषण करू, असे अंतरवाली सराटी येथील शिवाजी भागवत यांनी सांगितले. रवींद्र खरात, प्रा. सत्संग मुंढे, श्रीराम जाधव, मा आमदार नारायणराव मुंडे आदीनी मते मांडली. माजी आमदार नारायणगाव मुंडे, श्रीराम जाधव, मोती पवार, विजय खटके, कुलदीप आटोळे, शेषराव शिनगारे, दिनेश गाजरे, बाळासाहेब गावडे, बंडू वाघमारे आदी उपस्थित होते. आव्हान ससाणेंनी दिले. सरकारने ओबीसींवर अन्याय केला. सापत्न वागणूक दिली आहे. काही ओबीसींवर गुन्हे दाखल केले आहेत. विधानसभा निवडणुकीची आ- चारसंहिता लागू होण्यापूर्वी ते मागे घ्यावेत. विधानसभा निवडणुकीत ओबीसींचे शंभर आमदार निवडून आले पाहिजे, यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले

# जिल्हाध्यक्ष माजी आ.अरविंदराव चव्हाण यांना जालना विधानसभेचे तिकीट द्या!

**जालना जिल्ह्यातील आठ तालुक्यातील तालुकाध्यक्षकांनी अजितदादांकडे केली मागणी**

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सचिव विधान परिषदेचे आमदार माननीय श्री शिव- ाजीराव गर्जे साहेब व युवक प्रदेश अध्यक्ष मा.श्री.सूरज दादा चव्हाण यांच्याद्वारे निवेदन सादर केले सोबत जालना जिल्हा कार्याध्यक्ष माननीय श्री चंद्रकांत जी कारके व जालना जिल्ह्यातील परतुर तालुका अध्यक्ष विठ्ठलराव बरकुले मंठा तालुकाध्यक्ष गणेशराव घारे अंबड तालुका अध्यक्ष सतीशराव ढवळे घनसांगी तालुका अध्यक्ष लक्ष्मणराव कंटुले भोकरदन तालुका अध्यक्ष सुरेशराव सपाटे जाफराबाद तालुका अध्यक्ष दत्तू अंभोरे पाटील सोशल मीडिया तालुकाध्यक्ष रमेश पाईकराव यांनी सर्व लोकांनी दादाकडे एकच मागणीचे साकडे घातले ते म्हणजे माननीय श्री अरविंद अण्णा चव्हाण यांना विधानसभेचे तिकीट मिळावे व अन्नाला आमदार करण्याची ताकद सर्व जिल्ह्यातून लावण्यात येईल असे शब्द देऊन दादाकडे मागणी केली आहे.

# सोयीबीन पिकास ८५०० हमीभावासाठी दहा दिवसापासुन घाडगे पाटील यांचे आमरण उपोषण

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**



महाराष्ट्रातील शेतकर्यांना सोयाबीन पिकाला केंद्र सरकारने ४८९२ हमीभाव जाहीर केला असुन या भावाने शेतकर्यांचा उत्पादन खर्चही निघत नसुन शेतकर्यांना किमान ८५००रुपये हमीभाव मिळावा या मांगण- ीसाठी अ.भा.छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विजयकुमार घाडगे पाटील हे १८सप्टेंबर पासुन औसा जि.लातुर येथे उपोषणास बसले आहे त्यांच्या उपोषणास १० दिवस पुर्ण झाले असुन त्यांची प्रकृती खालावत असुन चिंताजनक बनली आहे त्यांच्या मांगणीचा सकारात्मक विचार करून त्यांचे उपोषण सोडवण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न करण्यात यावे नसता अ.भा.छावा संघटना भोकरदन तालुक्याच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल व या आंदोलनाच्या परीणामास शासन जबाबदार राहील असा इशारा तहसील कार्यालयामार्फत शासनास छावा संघटनेचे मराठावाडा उपाध्यक्ष ज्ञानेश्वर गायकवाड,जिल्हा उपाध्यक्ष दत्ता पाटील ठाले,ता.अध्यक्ष विष्णु गाढे,वि.आघाडी ता.अध्यक्ष सुनिल सिरसाट,शहराध्यक्ष नंदु जाधव,ता.उपाध्यक्ष अंकुश जाधव,ता.प्रसिद्धी प्रमुख अप्पासाहेब जाधव यांनी निवेदन देऊन दिला आहे.

### राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेत सुवर्ण पदक पटकावणारे कैलाश झोळगे यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

नागपूर येथील एनआयटी जलतरण तलावावर महाराष्ट्र राज्य वेटरेंस स्विमिंग एसोसिएशनच्या सिल्वर जुबली वर्षानिमित २१ ते २२ सप्टेंबरदरम्यान पार पडलेल्या राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेत जालना येथील राष्ट्रीय जलतरणपटू कैलाश झोळगे यांनी चमकदार कामगिरी करून जलतरणच्या विविध प्रकारच्या स्ट्रोकसमधे एकूण चार सुवर्ण पदकाची कमाई करत सोनेरी चोकार लगावल्याबद्दल सिविल क्लब स्विमिंग पूल सदस्यांच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. या स्पर्धेत महाराष्ट्रातील २५ जिल्ह्यातुन विविध व्योगटातील महिला व पुरुष जलतरणपटु सहभागी झाले होते. ४५ ते ५० वयोगटात जालना येथील राष्ट्रीय जलतरणपटु, प्रशिक्षक तथा क्रीडा मार्गदर्शक आणि विश्वकर्मा पुरस्काराने सम्मानित कैलाश झोळगे यांनी ५० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक,१०० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक, ४बाय ५० मीटर मिडले आणि ४ बाय ५० मीटर फ्री स्टाइल रिलेत सुवर्णपदक पटकावले.



**तभा वृत्तसेवा**

दोन इंद्रधनुष्याचे दृश्य माहोऱ्याहून आज दिसत असुन या इंद्रधनुष्यांचे माहोरा येथील बाजार चा दिवस असल्यांने हजारो भक्तनी घेतले दोन इंद्रधधुष्याचे दर्शन (छाया : बाळासाहेब गव्हले, माहोरा )

# आधार कार्ड उपडेट साठी कॅम्पचे आयोजन

**संजय गांधी-श्रावणबाळ योजनेतील लाभार्थींनी लाभ घ्यावा-तहसीलदार डॉ.प्रतिभा गोरे**

**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**

तालुक्यात संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ योजनेच्या लाभार्थींना डीबीटी मार्फत त्यांच्या खात्यात पैसे जमा करण्यात येणार आहेत. त्यासाठी लाभार्थ्यांना आपल्या खात्याशी आधार क्रमांक आणि मोबाईल क्रमांक लिंक करावा लागणार आहे.

संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ निवृत्तीवेतन योजनेचा लाभ घेत असलेल्या पात्र निराधार लाभार्थी यांचेकडून बँक खात्याला आधार कार्ड व मोबाईल क्रमांक संलग्न करुन संकलित करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. त्यामुळे परतूर शहरातील लाभार्थींनी विहीत मुदतीत आवश्यक ती कागदपत्रे सादर करणे गरजेचे आहे. जे लाभार्थी सदर कागदपत्रे या कार्यालयास सादर करणार नाहीत त्यांचा लाभ बंद झाल्यास त्यासाठी लाभार्थी स्वतः सर्वस्वी जबाबतदार राहील याची नोंद घ्यावी असे आवाहन तहसीलदार डॉ.प्रतिभा गोरे यांनी केले आहे.

परतूर शहरातील संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ निवृत्तीवेतन योजनेचा लाभ घेत असलेल्या लाभार्थ्यांनसाठी सूचना ई- आधार कार्ड काढण्यासाठी दिनांक २८ सप्टेंबर २०२४ रोजी आधार कार्ड कॅम्पचे आयोजन अहिल्याबाई होळकर सभागृह नगर परिषद जवळ परतूर येथे करण्यात आले आहे.तरी सर्व लाभार्थ्यांनी स्वतः उपस्थित राहून जूने आधार कार्ड व मोबाईल क्रमांक यासह आयोजित कॅम्प मध्ये ई- आधार कार्ड काढून ई- आधार कार्ड ची प्रत हयात प्रमाणपत्र, बँक पासबूक झेरॉक्स प्रत, मोबाईल क्रमांक योजनेबाबत पुराव्याची झेरॉक्स प्रत अशी सर्व कागदपत्रे दिनांक ३० सप्टेंबर २०२४ पूर्वी संजय गांधी विभाग तहसिल कार्यालय परतूर येथे समक्ष सादर करण्यात यावी असे श्रीमती गोरे यांनी सांगितले आहे.

# श्रमिक संघटनेचे प्रमुख संदीप साबळे व पदाधिकाऱ्यांच्या प्रवेशामुळे मोठी ताकद मिळाली –अर्जुनराव खोतकर

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**



जालना शहरात श्रमिक संघटनेचे मोठे जाळे असून या संघटनेचे प्रमुख संदीप साबळे व संघटनेचे सर्व पदाधिकारी महीला कार्यकर्त्यांच्या शिवसेना प्रवेशामुळे आपल्याला मोठी ताकद मिळाली असून या संघटनेने माझ्यावर व शिवसेना पक्षावर योग्य वेळी जो विश्वास दाखवून शिवसेनेत प्रवेश केला त्यामुळे मी श्रमिक संघटनेचे प्रमुख संदीप साबळे व त्यांच्या सर्व संघटनेच्या बंधू-भगिनीचे मनापासून शिवसेना पक्ष स्वागत करतो. व त्यांना शुभेच्छा देतो. या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी आपल्यावर योग्य वेळी विश्वास दाखवून शिवसेना पक्षात प्रवेश केला त्यांचा या पक्षात योग्य सन्मान केला जाईल, त्यांचा विश्वासघात होणार नाही अशी ग्वाही देतो, असे शिवसेना उपनेते तथा माजी राज्यमंत्रीअर्जुनराव खोतकर यांनी पक्षप्रवेश सोहळ्या दरम्यान उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले.

आज श्रमिक संघटनेचे प्रमुख संदीप साबळे यांनी व त्यांच्या सर्व महिला पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी वाजत गाजत मिरवणूक काढून शिवसेना पक्षात दर्शना बंगल्यावर अर्जुनराव खोतकर यांच्या उपस्थितीमध्ये जाहीर प्रवेश केला. सर्वांचे अर्जुनराव खोतकर यांनी स्वागत केले .यावेळी युवासेनेचे सचिव अभिमन्यू खोतकर, दलित आघाडी शिवसेना जिल्हाप्रमुख भास्करराव मगरे, महिला आघाडी जिल्हाप्रमुख कालींदाताई ढगे, उपजिल्हाप्रमुख संतोष मोहिते, महिला आघाडी शहर प्रमुख उज्वलाताई फोपलीया ,माजी नगरसेवक निखिल पगारे, विजय जाधव, संजय गायकवाड, ॲडवोकेट आस्पाक पठाण, माजी नगरसेवक विजय जाधव, ॲडवोकेट बबन मगरे, ताहेर खान, युवा सेनेचे राहुल गवारे,कुणाल जाधव यांची उपस्थिती होती.

यावेळी प्रवेश कर्ते व श्रमिक संघटनेचे प्रमुख संदीप साबळे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की आम्ही संघटनेच्या माध्यमातून सामाजिक कार्यात सतत सहभागी असतो संघटनेच्या माध्यमातून गोरगरिबाचे प्रश्न सोडवण्यासाठी काम करतो. विद्यमान आमदार दलित मुस्लिमांच्या मतावर निवडून आले आहेत. परंतु त्यांच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करतात प्रश्न सोडवण्याचे काम तर दूरच परंतु कधी त्यांची साधी भेटही होत नाही. त्यामुळे आपण व आमच्या संघटनेने जनसेवेचे सतत कार्य करणारे सामान्याचे प्रश्न सोडवणारे शिव- सेना उपनेते तथा माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांच्या पाठीमागे ठामपणे उभा राहून येणाऱ्या निवडणुकीमध्ये त्यांना भरघोस मताधिक्याने निवडून आणायचे असा निर्धार केलेला आहे. यावेळी ॲडवोकेट भास्करराव मगरे माझे नगरसेवक निखिल पगारे यांनी देखील मार्गदर्शन केले.

# आतंकवादाच्या खात्म्यासाठी अधिनस्थ अधिकारी सशस्त्र सज्ज !

## दीक्षांत सोहळ्यात प्रशिक्षणार्थी जवानांची शपथ

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड, दि. २७ सप्टेंबर -**

आतंकवाद, उग्रवाद, नक्षलवाद, अलगाववाद अन्य देश विघातक बाबीचा खात्मा करण्यासाठी ४२१ प्रशिक्षण अधिनस्थ अधिकाऱ्यांनी दीक्षांत सोहळ्यात सामूहिक शपथ घेतली असून यावेळी जवानांनी सादर केलेले थरारक प्रात्यक्षिके सर्वांचे डोळे दिपवुन टाकणारे ठरले आहे.



मुदखेड येथील केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या प्रांगणात ता. २५ बुधवार रोजी ४२१ अधिनस्थ अधिकारी दीक्षांत सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. भारतीय पोलीस सेवा अप्पर महानिदेशक दीपक कुमार महानिरीक्षक सी टी व्यंकटेश, उपमहानिरीक्षक आर टी सी अमिरुल हसन अन्सारी लातूर,सी टी सी कामाडंट व्ही पी त्रिपाटी यांची प्रमुख उपस्थिती होती. अधिनस्थ अधिकाऱ्यांनी पथसंचलन करीत सलामी दिली. यावेळी शहीद जवानांच्या वीर पत्नींचा दीपककुमार यांच्याहस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी प्रशिक्षण देणाऱ्या मार्गदर्शकांना उल्लेखनीय कार्याबद्दल ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी अभिजित राऊत, पोलिस महानिदेशक शहाजी उमाप आणि पोलीस अधिक्षक अविनाश कुमार,दीपक कुमार,अरुण कुमार, मोहम्मद शहानवाज, जाकी कुमार, हरीशंकर प्रसाद, वासुदेव, निलेश कुमार, सी संजीवन, एस रमेश, उपस्थित होते.

देशातील विविध राज्यातून प्रशिक्षण घेण्यासाठी आलेल्या ४२१ अधिनस्थ अधिकाऱ्यांना ४८ आठवड्यांच्या कालावधीत सखोल प्रशिक्षण देण्यात आले. या दलात थेट नियुक्त करण्यात आलेल्या अधिनस्थ अधिकारी कर्मचाऱ्यांची महत्वाची भूमिका म्हणजे दुर्गम भागातील नक्षलवाद, पूर्वोत्तर राज्यातील अलगाववाद, उग्रवाद, आतंकवाद यासोबतच संवेदनशील क्षेत्रातील संप्रदायिक उपद्रवांचा समूळ नायनाट करण्यासाठी या जवानांची भूमिका महत्वपूर्ण ठरणार असल्याचे मत अप्पर महानिदेशक दीपककुमार यांनी व्यक्त केले आहे.

**दीक्षांत समारोहात साहसी प्रात्यक्षिक सादर**

दीक्षांत समारोहात साहसी खेळ आणि प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. यात योग, मल्लखांब, रायफल चालवणे, अग्नी रिंग मधून जवानांच्या उड्या आणि मोटार सायकलचे साहसी प्रदर्शन यावेळी सादर करण्यात आले.

# शहीद भगतसिंघ चौकात अपघात टाळण्यासाठी उपाय योजना करण्याकडे बांधकाम विभागाचे दुर्लक्ष

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. २७ सप्टेंबर -**

शहरातील असर्जन परिसरात जवळपास दिड वर्षापुर्वी असर्जन नाका ते हस्सापूर रोड हा मार्ग तयार केला आहे. परंतु या मार्गावरील शहीद भगतसिंग चौक येथे अपघात टाळण्यासाठी कुठलीही उपाययोजना करण्यात आली नाही. वाहनधारक या मार्गावरून आपली वाहने भरधाव वेगाने नेत असल्याने मोठा अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली असताना बांधकाम विभागाने अपघात रोखण्यासाठी आतापर्यंत कुठलीही उपाययोजना केली नसल्याने बांधकाम विभाग एखाद्या मोठ्या अपघाताची वाट पाहते की काय ? असा संतप्त सवाल असर्जन परीसरातील नागरीक उपस्थित करत आहेत.

असर्जन नाका ते हस्सापूर रोड या रस्त्याचे काम जवळपास दिड वर्षापुर्वी करण्यात आले आहे. परंतु या मार्गावरील शहीद भगतसिंग चौक येथे अपघात रोखण्यासाठीची कुठलीही उपाययोजना करण्यात आली नाही. या चौकातुन नांदेड ते लातुर, गंगाखेड मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक असते. याच मार्गावर विष्णुपुरी येथे शासकिय रुग्णालय असल्याने या मार्गावर वाहनांची गर्दी वाढली आहे. तसेच जड वाहने देखील या भरधाव वेगाने जात असल्याने मोठा अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या मार्गावर दररोज किरकोळ अपघात होणे नित्यनियमाचे झाले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने या ठिकाणी अपघात रोखण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात अशी मागणी मागील दिड वर्षापासुन असर्जन, धुमाळवाडी परीसरातील नागरीकांतुन मागील दिड वर्षापासुन होत आहे तर जनता पँथर या संघटनेने शहीद भगतसिंघ चौकात रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा देखील दिला होता. परंतू सार्वजनिक बांधकाम विभाग ही मागणी गांभीर्याने घेत नसल्याने बांधकाम विभाग एखाद्या मोठ्या अपघाताची वाट पाहते की काय ? असा संतप्त सवाल असर्जन, धुमाळवाडी परीसरातील नागरीक व्यक्त करीत असुन एखाद्या अपघाताला कारणीभुत ठरण्यापुर्वी येथील होत आहे. वेगाने आपली वाहने नेत असल्याने मोठा अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या मार्गावर दररोज किरकोळ अपघात होत असून एखादा मोठा अपघात होण्यापुर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाने या ठिकाणी अपघात



### बांधकाम विभाग मोठ्या अपघाताची वाट पाहते की काय ? असर्जन परीसरातील नागरीकांचा संतप्त सवाल

रोखण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात अशी मागणी होत आहे.

**फ्लश आऊटमुळे जड वाहनावर लगाम**

जिल्हा पोलिस अधिक्षक अबिनाशकुमार यांनी फ्लश आऊट ऑपरेशन सुरु केले असल्याने बहुतांश प्रमाणात असर्जन ते हस्सपूर या मार्गावरुन अवैधरीत्या होणारी रेती, माती, मुरुमाची वाहतुक थांबली असुन जड वाहनावर लगाम लागला आहे. विशेष म्हणजे असर्जन ते हस्सापूर या मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतुक होत होती. हे वाहनधारक भरधाव वेगाने वाहन नेत असल्याने अपघाताची शक्यता देखील वाढली होती.

## संक्षिप्त वृत्त

### शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी सौ. मंगनाळे तर उपाध्यक्ष पदी पुंजाजी

**नायगाव**-मांजरम येथील जिल्हा परिषद हायस्कूलच्या नुतन शालेय व्यवस्थापन समितीच्या निवडी संदर्भात बुधवारी नुकतीच बैठक घेण्यात आली.यावेळी निवडणूक नघेता ही निवड बिनविरोध पार पडली. यात अध्यक्ष पदी लक्ष्मीबाई उमेश मंगनाळे तर उपाध्यक्षपदी उमाताई मोतीराम पुंजाजी यांची बिनविरोध निवड करण्यात आली. मांजरम येथील जिल्हा परिषद हायस्कूल येथे अडीच वर्षांच्या कालावधीत व्यवस्थापन समितीची निवड लोकशाही पध्दतीने करण्यात येते.शालेय विद्यार्थींच्या इच्छूक पालकांना या निवडी मध्ये सहभागी होता येते.प्र.मुख्याध्यापक पी.आर.ठीकाणे यांच्या अध्यक्षतेखाली पालकांची बैठक घेण्यात आली. पालकांच्या बैठकीत शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी लक्ष्मीबाई उमेश मंगनाळे यांची तर उपाध्यक्षपदी उमाबाई मोतीराम पुंजाजी यांची बिनविरोध निवड करण्यात आली.तर सदस्यपदी रिजवाना सादीक शेख, अनिता नागेश वाघमारे, बालाजी वैजनाथ पांचाळ, मारोती बापुराव बोईनवाड , गंगाधर गणपती फुगारे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.या निवडीचे सर्वत्र स्वागत होत आहे.



### भगवान परशुराम आर्थिक विकास मंडळ स्थापन केल्याबद्दल आनंदोत्सव

**नायगाव**-महाराष्ट्र राज्यातील महायुती सरकारने २३ सप्टेंबर रोजी मंत्री मंडळ निर्णयात भगवान परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन करून आर्थिकदृष्ट्या दुर्बल ब्राह्मण समाजा करीता गेल्या अनेक दिवसा पासून प्रलंबित मागणीची दखल घेऊन यशस्वी निर्णय घेतल्या बद्दल नायगाव ब्राह्मण महासंघ च्या वतीने भगवान परशुराम यांच्या प्रतिमेचे पूजन करून महायुती सरकारचे अभिनंदन करून ,फटाके वाजवून व पेढे वाटून आनंद व्यक्त करण्यात आला. यावेळी अ.भा.ब्राह्मण महासंघ जिल्हाध्यक्ष ग्रा.बाळासाहेब पांडे मांजरमकर,तालुका अध्यक्ष प्रसाद देसाई,ज्येष्ठ सलागार श्याम कुलकर्णी,मंगेश देशपांडे,सुनील जोशी,युवा अध्यक्ष रोहन जोशी,उमेश महाराज नायगाव कर,नागठाणे सर,वे. शा.स.शाहू महाराज या सह ब्राह्मण महासंघ कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी युती सरकारने अनेक दिवसापासून प्रलंबित प्रश्न मार्गी लावून ब्राह्मण समाज उन्नती साठी प्रयत्न केल्या बद्दल शासनाचे ऋण व्यक्त करण्यात आले.संचलन श्याम कुलकर्णी यांनी तर आभार मंगेश देशपांडे यांनी मानले.



### धर्माबाद रेल्वे स्थानकास पहिले हु. पानसरे नाव देण्यासाठी प्रयत्न करणार - चिखलीकर

**बिलोली**-धर्माबाद रेल्वे स्टेशनला मराठवाडा मुक्ती संग्रामातील पहिले हुतात्मा गोविंदराव पानसरे यांचे नाव देणे याबाबत कोणाचेच दुमत असण्याचे कारण नाही. यासाठी मी स्वतः शासन पातळीवर प्रयत्न करणार आहे.असे प्रतिपादन भारतीय जनता पार्टीचे नेते माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केले. ते मराठवाडा मुक्ती संग्राम जागर कार्यक्रमात बोलत होते. सोमवार दिनांक २३ सप्टेंबर २०२४ रोजी मराठवाडा मुक्ती संग्रामातील जागर कार्यक्रमातील मुलाखतीत विविध विषयांवर त्यांनी प्रकाश टाकला.प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी त्यांच्या संसद सदस्यत्वाच्या कालखंडातील रेल्वे विमानसेवा आणि रस्ते कामांची माहिती देत असतानाच मराठवाडा मुक्ती संग्राम महोत्सव कार्यक्रमांतर्गत सांस्कृतिक मंत्रालयाच्यावतीने घेण्यात आलेल्या उपक्रमाचा आढावा घेतला. यात म्हणावे तसे काम झाले नाही. याबाबत अजून भरपूर काम करण्यासारखे आहे असेही प्रतापराव पाटील चिखलीकर व्यक्त केले. बिलोली तालुक्यात आयुष्य खर्च केलेल्या, शेवटी कुंडलवाडी जवळ अर्जापूर येथे प्राणाची आहूती दिलेल्या हुतात्मा गोविंदराव पानसरे यांचे नाव देशातील अन्य लोकांना ज्ञात होण्यासाठी त्यांचे कार्य केवळ बिलोली तालुक्यापुरते नव्हते तर देश पातळीवरचे होते. याची जाणीव करून देण्यासाठी कुणीतरी पुढाकार घेण्याची गरज होती. हा पुढाकार राज्य पत्रकार परिषद आणि स्वर्गीय बसवंतराव मुंडकर विचार मंचाने घेतला,असेही ते म्हणाले.याबाबत आजच पंतप्रधान आणि रेल्वेमंत्री यांना माझ्या कार्यालयातून पत्र पाठवणार असल्याचे जाहीर केले. यावेळी चैतन्य बापू देशमुख,बालाजी बच्चेवार, नायगावकर, श्रावण पाटील भिलवंडे नरसीकर, डॉ. शिवदास हमंद, गोविंद मुंडकर,साहेबराव जाधव, प्रसाद देशपांडे आदींची उपस्थिती होती.

## कापुस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना मिळणार अर्थसहाय्य

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. २७ सप्टेंबर -**

राज्यातील ज्या कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांनी सन २०२३ च्या खरीप हंगामामध्ये ई-पीक प, पोर्टलद्वारे कापूस व सोयाबीन लागवडीची नोंद केली आहे. अशा नोंदणीकृत शेतकऱ्यांना अर्थसहाय्य मिळणार आहे. अशा शेतकऱ्यांनी नजीकच्या सेतू सुविधा केंद्रावर जावून आपले ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करुन घ्यावी. ई-केवायसी पूर्ण केल्यावरच एकवेळ अनुदान वितरणासाठी शेतकरी पात्र ठरणार आहेत. तरी शेतकऱ्यांनी २७ सप्टेंबर २०२४ पर्यत ई-केवायसी प्रक्रीया पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी भाऊसाहेब बऱ्हाटे यांनी केले आहे.

लाभार्थी शेतकऱ्यांना ०.२० हेक्टर पेक्षा कमी क्षेत्रासाठी सरसकट १ हजार रुपये तर ०.२० हेक्टर पेक्षा जास्त क्षेत्रासाठी त्यांच्या क्षेत्रानुसार प्रती हेक्टर ५ हजार (२ हेक्टरच्या मर्यादेत) अर्थ सहाय्य देण्यात येणार आहेत. शेतकऱ्यांकडून प्राप्त झालेले संमतीपत्र व नाहरकत पत्र तालुका कृषी अधिकारी कार्यालयामार्फत संकलित करुन शासनाने महाआयटीकडून तयार केलेल्या scagridbt.mahaitgov.in या वेबपोर्टलवर माहिती भरली जात आहे. यासाठी कोणत्याही मध्यस्थांचा सहभागाशिवाय आर्थिक सहाय्य योजना पात्र लाभार्थ्यांकडून त्यांच्या आधार-सीड बँक खात्यापर्यत पोहोचते याची खात्री करण्यासाठी राज्याने ई-केवायसी प्रक्रिया सुरु केली आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या मोर्चाने जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात दणाणला

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. २७ सप्टेंबर -**

जिल्ह्याभरासह शहरांमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकरी व नागरी भागातील सखल भागातील रहिवाशांचे अन्नधान्य व संसारोपयोगी सामानाचे नुकसान झाले होते. झालेल्या नुकसानीपोटी प्रत्येकी कुटुंब पंचवीस हजार रुपये सानुग्रह अनुदान देण्याच्या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा शहर सरचिटणीस प्रवीण घुले यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या मोर्चाने शुक्रवारी जिल्हाधिकारी परिसर दणाणून गेला होता.

जिल्हाभरासह शहरांमध्ये दि. ३१ ऑगस्ट ते ०३ सप्टेंबर दरम्यान मोठी अतिवृष्टी झाली होती. या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे व शहरातील सखल नागरी भागातील घरांमध्ये पाणी शिरून अन्नधान्य व संसारोपयोगी साहित्याचे मोठे नुकसान झाले होते. यामुळे नागरिकांना मोठ्या त्रास सहन करावा लागल्याने त्यांना प्रती कुटुंब रुपये २५००० सानुग्रह अनुदान देण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा शहर सरचिटणीस प्रवीण घुले यांनी केली होती. या मागणीसाठी शुक्रवार दि. २७ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर प्रचंड मोर्चा काढण्यात आला या मोर्चातील घोषणाबाजीमुळे जिल्हाधिकारी परिसर दणाणून गेला होता.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा शहर सरचिटणीस घुले यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या मोर्चामध्ये छगन पाईकराव, ज्ञानेश्वर गजभारे, सचिन हटकर, साहेबराव जोंधळे, चंद्रकांत सोनकांबळे, गौतम भद्रे, राहुल कांबळे, संदीप नवघरे, शेख बशीर, चंद्रकांत सोनकांबळे, बळीराम निखाते, वैजंताबाई निखाते, भोजुबाई ढबाले, अर्चना घुले, पंचफुलाबाई धुतराज , सुमनबाई कांबळे, सरफराज अहमद, बिस्मिल्ला बी , राष्ट्रपाल राजभोज, साहेबराव भदर्गे, प्रदीप आढाव, चंद्रकांत इंगळे, लक्ष्मीबाई गायगोधने, लताबाई पाईकराव, साधनाबाई झेंनेकर यांच्यासह हजारो नागरिक उपस्थित होते.

## स्वच्छता ही मनुष्य जिवनाची प्राथमिक गरज, ती प्रत्येकाने जोपासली पाहिजे : कांदे

**तभा वृत्तसेवा**
**माहुर, दि. २७ सप्टेंबर -**

स्वच्छता ही मनुष्य जीवनाची प्राथमिक गरज असून, ती प्रत्येकाने जोपासली पाहिजे.स्वच्छतेच्या बाबतीत आपले तीर्थक्षेत्राचे माहूर शहर हे प्रथम क्रमांकाचे शहर बनविण्यासाठी सर्वांना प्रयत्न करावे लागणार आहेत. त्यासाठी शहरवासीयांनी सहकार्य करावे! असे आवाहन मुख्याधिकारी विवेक कांदे यांनी केले आहे.

केंद्रीय गृहनिर्माण तथा शहरी कार्य मंत्रालय,भारत सरकार यांनी स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत स्वच्छता पंधरवडा मार्फत 'स्वच्छ्ता ही सेवा अभियान' अंतर्गत स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता ही मोहीम १७ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोंबर दरम्यान राबविण्याचे कळविलेले आहे. त्यानुषंगाने आज बुधवार दिनांक २५ रोजी माहूर नगरपंचायतचे मुख्याधिकारी विवेक कांदे यांच्या मार्गदर्शनात शहरातील मातृतिर्थ तलाव रस्त्यावर 'स्वच्छता मोहीम' राबविण्यात आली.त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी मार्गदर्शन करताना नगराध्यक्ष फिरोज दोसानी म्हणाले की,शहर स्वच्छ व सुंदर करण्याबरोबरच शहरातील नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीकोनातूनही सफाई कर्मचाऱ्यांचे योगदान अत्यंत महत्वाचे आहे. राज्यातील एक प्रसिद्ध तीर्थक्षेत्र असलेल्या श्रीक्षेत्र माहूर शहराला सुंदर साजेसे स्वरूप देण्यासाठी नगर पंचायत कडून राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांना शहरातील नागरिकांचा उस्फुर्त प्रतिसाद सदैव मिळत आलेला आहे.नागरिक ओला आणि सुका कचऱ्याचे विलगीकरण करून स्वच्छतेच्या उपक्रमात स्वयंस्फूर्तीने सहभाग घेत असतात! अशा शब्दांत कृतज्ञता व आभार व्यक्त करत 'स्वच्छता ही सेवा' या उपक्रमात देखील शहरातील नागरिकांनी सक्रीय सहभागी व्हावे असे नम्र आवाहन देखील दोसानी यांनी केले.

राबविण्यात आलेल्या अभियानात मुख्याधिकारी विवेक कांदे,नायब तहसीलदार डॉ.राजकुमार राठोड, कार्यालयीन अधीक्षक वैजनाथ स्वामी, नपं चे कर्मचारी संदिप गजलवाड,देविदास जोंधळे, विशाल ढोरे, देविदास सिडाम, सुरेंद्र पांडे,शेख मजहर, गणेश जाधव,विजय शिंदे,बसवंत कल्याण, रामसिंह थुरवाल, अनिल खडसे,नईम पाशा, जीवन खडसे, राहूल खंदारे, समाधान राठोड, विलास बोरकर, शेख शब्बीर, संदिप गोस्वामी व स्वच्छता कामगार सहभागी होते.

## महिलांनी मानले सरकारचे धन्यवाद

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड, दि. २७ सप्टेंबर -**

लाडकी बहीण योजना महाराष्ट्र राज्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे,महिला प्रदेशाध्यक्षा रुपालीताई चाकणकर ,या सर्वांच्या आदेशान्वये,नांदेड जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष इंजिनीयर विश्वंभर पवार व महिला जिल्हाध्यक्षा पूजाताई व्यवहारे डोंगरगावकर, यांच्या मार्गदर्शनात दि. २२ सप्टेंबर रोजी मुदखेड तालुका येथे बसस्थानक येथे,माझी लाडकी बहीण योजना ,लेक लाडकी,मुलींना मोफतपदवी शिक्षण,अन्नपूर्णा,या सर्व योजना दिल्या बद्दल महायुती सरकार व अजित दादा पवार,यांचे विशेष धन्यवाद म्हणून तसेच या सर्व योजना महिलांना लाभदायक आहेत.

## रासेयोतून घडलेले विद्यार्थी पुढे जीवनात यशस्वी होतात: कुलगुरू डॉ. मनोहर चासकर

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड, दि. २७ सप्टेंबर -**

राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये सभ्यता, शिस्त, प्रामाणिकता, कौशल्य इत्यादी चांगली मुले जोपासली जातात. जे की जीवनात यशस्वी होण्यासाठी खूप महत्त्वाचे असतात. म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेमधील स्वयंसेवक आणि स्वयंसेविका जीवनात पुढे यशस्वी होतात असे मत विद्यापीठाचे कुलगुरू तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. मनोहर चासकर यांनी व्यक्त केले.

ते दि. २६ सप्टेंबर रोजी विद्यापीठातील दीक्षान्त सभागृहामध्ये आयोजित कार्यक्रमाच्या उद्घाटन समारंभात मार्गदर्शनपर बोलत होते. यावेळी त्यांच्या समवेत मुंबई विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष कार्यसन अधिकारी डॉ. सुशील शिंदे, मुंबई विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी रमेश देवकर, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. नरेंद्र चव्हाण, डॉ. सुरेखा भोसले, कुलसचिव डॉ. शशिकांत ढवळे. प्रा. रवींद्र खडकीकर, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सूर्यप्रकाश जाधव, क्रीडा विभागाचे संचालक डॉ, भास्कर माने, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मल्लिकार्जुन करजगी यांची उपस्थिती होती.

राष्ट्रीय सेवा योजना क्षेत्रीय कार्यालय पुणे, युवा कार्य व क्रीडा कार्यालय भारत सरकार, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन मुंबई व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय व राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन पथसंचलन पूर्व निवड चाचणी शिबिराचा आज उद्घाटन समारंभ कार्यक्रम पार पडला.

पुढे डॉ. चासकर म्हणाले राष्ट्रीय सेवा योजनेतील प्रत्येक स्वयंसेवक व स्वयंसेविकेचे राज्य किंवा राष्ट्रीय परेड साठी निवड होण्याचे स्वप्न असते. तुमच्या पैकी ८६ स्वयंसेवकांचे स्वप्न पूर्ण होणार आहे. सर्वांनीच आपले कौशल्य दाखविण्याची ही वेळ आहे. पुढे ते स्वच्छते बाबतीत बोलताना ते म्हणाले, पाश्चात्त्य देशात अगदी बालपणापासून स्वच्छतेची जाणीव विद्यार्थ्यांच्या मनात रुजवली जाते. पुढे त्यांना स्वच्छतेबद्दल धडे देण्याची गरज नाही त्यामुळे ते त्यांचे घर आणि देश सुंदर ठेवतात. राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवकही स्वच्छतेचे दूत आहेत. त्यांनी आपला भारत देश सुंदर कसा होईल या बाबतीत जागरूक असले पाहिजे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

प्रमुख पाहुणे डॉ. सुशील शिंदे म्हणाले, राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये स्वयंसेवक केवळ स्वच्छता अभियानासाठी नसतात. तर ते राष्ट्रीय पथसंचलन सुद्धा चांगल्या पद्धतीने करत असतात. म्हणून केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्या वतीने असे शिबीर घेतले जातात. यातून विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व विकसित होते.

यावेळी दुसरे प्रमुख पाहुणे डॉ. देवकर म्हणाले, राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी आपल्या जवळील चांगल्यात चांगल्या परेडसाठी कौशल्य देण्याची आणि दाखविण्याची ही वेळ आहे. प्रत्येकांने स्वंयशिस्त पाळून आपले कार्य यशस्वी केले पाहिजे.

यावेळी मागीलवर्षी दिल्ली येथील परेडसाठी निवड झालेले विद्यार्थी विष्णू जाधव आणि कु. भाग्यश्री गैनवाड यांचा सन्मान कुलगुरूंच्या हस्ते करण्यात आला.

प. पूज्य स्वामीजींच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दिपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर रोपट्यास पाणी देऊन कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाची प्रस्तावना राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मल्लिकार्जुन करजगी यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अरुणा शुक्ला यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. अमोल काळे यांनी केले.

सदरील प्रजासत्ताक पूर्व संचलन शिबिरासाठी महाराष्ट्रातील ५१ विद्यापीठातील कृषी, तंत्रज्ञान, अकृषी, आरोग्य, पशुवैद्यकीय, महिला विद्यापीठ अशा विविध महाराष्ट्रातील विद्यापीठातून १६५ मुले स्वयंसेवक व १७४ मुली स्वयंसेविका तसेच या शिबारासाठी ९ पुरुष व १० महिला यांचा संघ व्यवस्थापक म्हणून सहभागी आहेत. शिबिराच्या यशस्वीतेसाठी विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी आणि विविध महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी परिश्रम घेत आहेत.

## माहूर लगतच्या मालवाडा घाटातील राष्ट्रीय महामार्गाच्या अर्धवट कामावर नवरात्र पूर्वी तोडगा

**तभा वृत्तसेवा**
**माहुर, दि. २७ सप्टेंबर -**

: तीर्थक्षेत्र माहूर शहराचे प्रलंबित विविध विकास कामे मार्गी लावण्यासाठी आज बुधवार दिनांक २५ सप्टेंबर रोजी खा.नागेश पाटील आष्टीकर यांच्यासोबत माहूर चे नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी जिल्हाधिकारी डॉ. अभिजित राऊत यांची भेट घेतली असता; माहूर शहरा लगतच्या मालवाडा घाटातील अर्धवट असलेल्या राष्ट्रीय महामार्गाच्या कामावर शारदीय नवरात्र पूर्वी तोडगा काढू व शहरातील रोहित्र अभावी बंद असलेले पथदिवे हे सुद्धा नावरात्रापूर्वी सुरू करण्यासाठी महामार्ग विभागाला तातडीच्या सूचना देण्यात येईल! अशी ग्वाही जिल्हाधिकारी राऊत यांनी दिली.यावेळी लांजीचे सरपंच मारोती रेकुलवार, अमित येवतीकर यांची उपस्थिती होती.



माहूर शहरापासून जेमतेम अवघ्या दोन किलोमिटर अंतरावर असलेल्या मालवाडा घाटात मागील दोन वर्षापासून रस्ता अर्धवट आणि एकेरी स्थितीत आहे.राष्ट्रीय महामार्गाच्या या रस्त्यावर वनविभागाने दावा केल्याने हे काम थांबले आहे.विशेष म्हणजे एका बाजूने सिमेंट काँक्रिट रस्त्याचे काम काही प्रमाणात झाले होते,तर एका बाजूने खोदून ठेवलेला रस्ता गिट्टी व इतर बांधकाम साहित्य टाकून बंद करण्यात आला आहे.

माहूर हे राज्यातील देवीच्या साडेतीन शक्तिपीठांपैकी श्री रेणुका देवीचे एक मुख्य पिठ आहे.याठीकाणी भरणाऱ्या विविध यात्रोत्सवांपैकी सर्वात मोठा व दिर्घ कालावधीत साजरा करण्यात येणारा उत्सव म्हणजे शारदीय नवरात्र महोत्सव होय.येत्या काही दिवसांवर हा उत्सव येऊन ठेपला असून,श्री रेणुका देवी संस्थान व तालुका यात्रा प्रशासन यात्रा महोत्सवाच्या जय्यत तयारीला लागला आहे. परवा माहूर दौऱ्यावर खा.नागेश पाटील यांनी घेतलेल्या आढावा बैठकीत माजी.आ.प्रदीप नाईक व

शिवसेना (उबाठा) ज्योतिबा खराटे यांनी मालवाडा घाटातील अर्धवट रस्त्याचा विषय खासदारांच्या लक्षात आणून दिला होता.तर नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी माहूर शहरातील पथदिवे महामार्ग विभागाच्या दुर्लक्षित धोरणानामुळे बंद असल्याने रात्रीला शहरात काळोख पसरत असल्याचे लक्षात आणून दिले होते.

तीर्थक्षेत्र माहूर शहरात उद्भवलेल्या या गंभीर समस्या सोडविण्यासाठी खा.नागेश पाटील आष्टीकर यांनी थेट नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांना बोलावून घेत नांदेड जिल्हाधिकारी डॉ. अभिजीत राऊत यांची भेट घेतली असता

याविषयी सकारात्मक प्रतिसाद देत सर्व समस्यांवर नवरात्र पूर्वी तोडगा काढण्यात येईल! असा विश्वास जिल्हाधिकारी राऊत यांनी यांनी दिला आहे.आता माहूर गडावर मोठ्या प्रमाणात साजरा केला जाणाऱ्या शारदीय नवरात्र महोत्सवासाठी उरलेल्या जेमतेम आठवडाभरात शहर व परिसरात उद्भवलेल्या या गंभीर समस्यांवर जिल्हाधिकारी राऊत किती लवकर काय तोडगा काढतात हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# ८१ आदिवासी गावांचा होणार कायापालट

## प्रधानमंत्री जनजातीय उन्नत ग्राम अभियान

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ सप्टेंबर**

दुर्गम व अति दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासी बांधवाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रधानमंत्री जनजातीय उन्नत ग्राम अभियानाला केंद्र सरकारने हिरवा कंदील दाखविला आहे. त्यामुळे देशातील ६३ हजार तर महाराष्ट्रातील ४ हजार ९७६ आदिवासी गावांचा कायापालट होणार आहे. त्या माध्यमातून राज्यातील ३२ जिल्ह्यातील १२ लाख ८७ हजार ७०२ आदिवासी बांधवाचे सामाजिक आणि आर्थिक सक्षमीकरण केले जाणार आहे. त्यामध्ये हिंगोलीतील ८१ गावांचा या अभियानात समावेश आहे. या अभियानासाठी आवश्यक निधी केंद्र आणि राज्य सरकारकडून उपलब्ध होणार आहे.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात प्रधानमंत्री जनजातीय उन्नत ग्राम अभियानाची घोषणा केली आहे. या अभियानात पीएम-जनमन अभियानात १७ मंत्रालयांव्दारे राबविण्यात येणाऱ्या विविध २५ उपक्रमांचा समावेश आहे. तसेच आदिवासी क्षेत्र, समुदायांचा सर्वांगीण आणि शाश्वत विकासावर भर दिला जाणार आहे. या अभियानांतर्गत पक्की घरे, ग्रामीण रस्ते, प्रत्येक घरात शुद्ध पेयजलाची सोय, सर्व घरामध्ये वीज जोडणी, फिरत्या वैद्यकीय पथकाची स्थापना, आयुष्मान कार्ड, घरगुती गॅस जोडणी, आदिवासी बहुद्देशीय विपणन केंद्र, आश्रमशाळांच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा, सिकलसेल ॲनिमियाशी लढण्यासाठी केंद्राची निर्मिती, अंगणवाडी केंद्र बांधणे, कौशल्य विकास प्रशिक्षण देणे, कृषी विभागाच्या योजनाचा लाभ देणे, मत्स्य व्यवसाय करण्यास चालना देणे, पर्यटनाचा विकास करणे इत्यादी विविध प्रकारचे लाभ देण्याबाबतची कार्यवाही ही नियोजनबद्धरित्या पुढील ५ वर्षामध्ये करण्यात येणार असून एकूण १७ विभागामार्फत हे लाभ देण्यात येणार आहेत. यामुळे आदिवासी बहुल गावांचा सर्वांगीण विकास होणार आहे. आदिवासी समाजाची सामाजिक व आर्थिक परिस्थिती उंचावण्यास मदत होणार आहे.

या अनुषंगाने हिंगोली जिल्ह्यातील हिंगोली, सेनगाव, औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील आदिवासी समाजाच्या सर्वच लाभार्थ्यांनी या योजनेचा वेळोवेळी लाभ घेण्याचे आवाहन हिंगोलीचे जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी केले आहे.

तसेच प्रधानमंत्री जनजातीय उन्नत ग्राम अभियानाच्या अनुषंगाने आदिवासी सामाजिक संस्था, संघटना, आदिवासी स्वयंसेवक यांनी आदिवासी प्रकल्प कार्यालयाशी समन्वय साधून या अभियानाचा एक भाग होण्याचे आवाहन कळमनुरी येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी डॉ. सुनिल बारसे यांनी केले आहे.

# पालिकेच्यावतीने स्वच्छता ही सेवा अंतर्गत सफाई कामगारांची आरोग्य तपासणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ सप्टेंबर**

स्वच्छता ही सेवा अंतर्गत नगर पालिकेमार्फत अग्निशमन कार्यालय परिसरात सफाई मित्र सुरक्षा आरोग्य तपासणी शिबीर उपक्रम राबविण्यात आला. यावेळी १६० सफाई कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत केंद्रीय गृहनिर्माण तथा शहरी कार्य मंत्रालय, भारत सरकार यांनी स्वच्छता पंधरवाडा अंतर्गत दि.१७ सप्टेंबर २०२४ ते दि.०१ ऑक्टोबर २०२४ दरम्यान स्वछता ही सेवा पंधरवड्याचे आयोजन करून स्वभाव स्वच्छता- संस्कार स्वच्छता हि संकल्पना राबविण्याचे निर्देश दिले आहेत. याअनुषंगाने नगरपालिके मार्फत शहरात विविध उपक्रम,लोकसहभाग, जनजागृती करणे बाबत आदेशित केले आहे. त्याअंतर्गत हिंगोली नगर परिषदेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी श्री. अरविंद मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली नगरपालिके मार्फत स्वच्छता हि सेवा अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. यामध्ये श्रमदान, स्वच्छता शपथ, एक पेड मा के नाम, विविध स्पर्धा, जनजागृती पर कार्यक्रम, सेल्फी पॉइंट, पथनाट्ये, स्वच्छता पाठशाला आदी कार्यक्रम आयोजित केले आहेत. नगर परिषदेच्या वतीने आज अग्निशमन कार्यालय परिसरात स्वच्छता हि सेवा डक्ढ अभियाना अंतर्गत सफाई मित्र यांच्या करीता आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी आरोग्य शिबिरात नगरपरिषद मधील जवळपास १६० सफाई कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची तपासणी करण्यात आली.तसेच त्यांना स्वताचे आरोग्य कसे सुदृढ व स्वस्थ ठेवता येईल याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी उपमुख्याधिकारी श्याम माळवटकर , स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर, अभियंता प्रतीक नाईक, अभियंता किशोर काकडे, प्रवीण मोहेकर, अभियंता सनोबर तसनीम, उत्तम जाधव, आशिष रणशिंगे, भागवत धायतडक, दिनेश वर्मा, विजय शिखरे, कमलेश इंगळे, अथर्व वर्मा, आकाश गायकवाड, रवी जोंधळे, रवी गायकवाद, चेतन भूजवाने, डॉ.चव्हाण, डॉ. पुंडगे, डॉ.शेख, शुभम पाटील, देशमुख यांच्या आरोग्य विभागातील कर्मचारी तसेच मोठ्या प्रमाणात नगर पालिका अधिकारी, स्वच्छता कर्मचारी उपस्थीत होते.

# चर्मकार महासंघाच्यावतीने १ आक्टोबरला प्रंचड मोर्चा

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, २७ सप्टेंबर**



मुंबई येथे होणाऱ्या चर्मकार महासंघाच्या प्रचंड मोर्चासाठी समाजाने लाखोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे मराठवाडा युवा कार्याध्यक्ष प्रा. माणिक चव्हाण यांनी केले आहे. यासाठी महासंघाच्यावतीने गावोगावी जाऊन माहीती देऊन पत्रकाचे वाटप करण्यात येत आहे.

मुंबई येथे होणाऱ्या समाजाच्या विविध मागण्यासाठी राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक अध्यक्ष माजी समाज कल्याण मंत्री बबनराव घोलप यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे प्रदेशाध्यक्ष माधवराव गायकवाड साहेब यांच्या नेतृत्वात दिनांक ०१ऑक्टोबर २०२४ मुंबई येथील आझाद मैदानावर प्रचंड मोर्चा काढण्यात येणार आहे. राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने या अगोदर बरेच आंदोलन आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा झाली. त्यामध्ये बऱ्याच मागण्या मान्य झाल्या परंतु त्याची आतापर्यंत अंमलबजावणी झालेली नाही. संत रविदास महाराज यांच्याजयंतीच्या दिवशी सार्वजनिक सुट्टी जाहीर करणे, संत रविदास चर्मोद्योग विकास महामंडळ थकीत कर्ज सरसकट माफ करणे, संत रविदास चर्मोउद्योग विकास महामंडळाच्या जाचक अटी शिथिल करणे अशा विविध मागण्यांचा समावेश आहे. मोर्चाच्या तयरीसाठी जिल्ह्यातील गावोगावी, ग्रामीण भागात जनजागृती करण्यात येत आहे. युवा अध्यक्ष बालाजी अन्नपुरे, उपाध्यक्ष गोविंद असोले, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख मारोती कुबडे, वसमत तालुका अध्यक्ष मुरली दळवे, उपाध्यक्ष किशन शहारे, शहर अध्यक्ष नागनाथ सोनट्के, गिरिधर इंगळे, सामाजिक कार्यकर्ते पिंटू काटकर आदी कार्यकर्ते व पदाधिकारी अहोरात्र प्रयत्न करत आहेत.

# खरबी येथील नदीपात्रातूनअवैध वाळू उपसा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ सप्टेंबर**

तालुक्यातील खरबी नदी, इंचा येथील ओढ्यातून पहाटे पाच ते सकाळी ९ वाजेपर्यंत नदीपात्रातून राजरोसपणे अवैध वाळू उपसा चालू आहे. पोलिस आणि महसूल विभाग मात्र याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे.

तालुक्यातील खरबी नदी पात्र आणि इंचा येथील तलावातून तीन ते चार ट्रॅक्टर नियमितपणे अवैध वाळूचा उपसा करीत आहेत. सदरील वाळू ही हिंगोली शहरात आणून विक्री केली जात आहे. हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्यांतर्गत हा भाग येत असून महसूल प्रशासनही गाढ झोपेत असल्याचे दिसत आहे. जाणीवपूर्वक दोन्ही विभाग दुर्लक्ष करीत असल्याचे दिसत आहे.

# खा. आष्टीकर यांच्या विरोधात ३० सप्टेंबरला धनगर समाजाचे आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली २७ सप्टेंबर**

हिंगोली लोकसभा मतदारसंघाचे खा. नागेश पाटील आष्टीकर यांनी२०२४-लोकसभा निवडणुकीत धनगर समाजाला अनुसूचित जमाती (एसटी) आरक्षणाची अंमलबजावणी करण्यासाठी निवडून आल्यानंतर संसद सभागृहात आवाज बुलंद करण्याचे आश्वासन दिले होते.म्हणून हिंगोली लोकसभा मतदारसंघातील लाखो धनगर बांधवांनी खा. नागेश पाटील आष्टीकर यांना मतदान करून मोठ्या मताधिक्याने निवडून आणले. मागील २० दिवसांपासून महाराष्ट्रातील सर्व धनगर बांधव अनुसूचित जमाती (एसटी) आरक्षणाची अंमलबजावणी करण्यासाठी रस्त्यावर उतरून जीवाची बाजी लावत सरकार विरोधात चक्का जाम, रास्तारोको, जेलभरो, मोर्चा, निदर्शने, घेराओ आंदोलन करत आहेत.त्याच प्रमाणे खासदार, आमदार, पालकमंत्री, कॅबिनेट मंत्री, लोकप्रतिनिधी यांच्या घरासमोर ढोल बजाओ आंदोलन करून धनगर एसटी आरक्षण अंमलबजावणी साठी लेखी पाठिंबा पत्र घेण्याचे ठरले आहे. परंतु हिंगोलीचे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी धनगर एसटी आरक्षण अंमलबजावणी करिता लेखी पत्र दिले नाही. उलट धनगर समाजाचा अपमान करत सोशल मीडियावर एक व्हिडिओ प्रसारित केला की, मी धनगर समाजाच्या एसटी आरक्षण अंमलबजावणी करिता कोणतेही पाठिंबा शिफारस पत्र दिले नाही. विरोधकांनी माझ्या खासदारांच्या शासकीय लेटर पॅडवर बनावट पत्र टाईप करून खोटी सही करून सदर पाठिंबा शिफारस पत्र सोशल मीडियावर व्हायरल केले आहे. मी धनगर समाजाच्या एसटी आरक्षणाला कधीच पाठिंबा देणार नाही.

हिंगोलीचे खासदार नागेश पाटील आष्टीकर हे धनगर आरक्षण विरोधी मानसिकतेचे आहेत. हे त्यांच्या व्हायरल झालेल्या व्हिडिओ वरून सिध्द होते. खासदार नागेश पाटील आष्टीकर यांना धनगर समाजाची ताकद दाखविण्याची वेळ आली आहे. धनगर आरक्षण विरोधी हिंगोलीचे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांचा जाहिर निषेध करून त्यांच्या विरुद्ध जोडे-मारो आंदोलन करण्यासाठी दि. ३० सप्टेंबर, सोमवार रोजी दुपारी १२ वा जिल्हाधिकारी कार्यालय,हिंगोली येथे मोठ्या संख्येने धनगर बांधवांनी जमा व्हावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## संक्षिप्त वृत्त

### आज राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन

हिंगोली- येथील जिल्हा न्यायालयात व त्या अंतर्गत येणाऱ्या विविध न्यायालयात तालुका विधी सेवा समिती व वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दिनांक २८ सप्टेंबर, २०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता न्यायालय परिसरात राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. या लोकअदालतीमध्ये भूसंपादन व मोटार अपघात नुकसान भरपाई प्रकरणे, तडजोड युक्त फौजदारी प्रकरणे, दिवाणी प्रकरणे, वैवाहिक/ कौटुंबिक वाद प्रकरणे, पराक्रम्य अभिलेख अधिनियमचे कलम १३८ खालील प्रकरणे, नगर परिषद, विद्युत महावितरण कंपनी, बँक व पतसंस्थांचे वादपूर्व प्रकरणे इत्यादी खटले तडजोडीसाठी ठेवण्यात आलेली आहेत. ही सर्व प्रकरणे आपआपसातील तडजोडीद्वारे निकाली काढता यावीत. यासाठी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. या राष्ट्रीय लोकअदालतीचा जास्तीत जास्त पक्षकार मंडळींनी उपस्थित राहून फायदा घ्यावा, असे आवाहन जिल्हा न्यायाधीश-१ तथा तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष आर. व्ही. लोखंडे, वकील संघाचे अध्यक्ष ड. एस. ए. वाबळे उमरेकर, सचिव ड. ए.एस.वानखेडे यांनी केले आहे.

### जिल्ह्यात सरासरी ८९० मिमी पाऊस

हिंगोली- जिल्ह्यात आतापर्यंत सरासरी ८९०.१० मि.मी. पाऊस झाला आहे. त्याची टक्केवारी १११.९२ अशी आहे. जिल्ह्यात गेल्या २४ तासात सरासरी ९.२० मिलीमीटर पावसाची नोंद झाली असून, कळमनुरी तालुक्यात सर्वात जास्त १३.६० मि.मी. पाऊस झाला आहे. तर औंढा नागनाथ तालुक्यात सर्वात कमी ३.९० मि.मी. पाऊस पडला आहे. जिल्ह्यात आज सकाळपर्यंत नोंदला गेलेला तालुकानिहाय सरासरी पाऊस पुढीलप्रमाणे असून कंसातील आकडेवारी १ जूनपासून आजपर्यंत झालेल्या पावसाची आहे. हिंगोली ४.६० (९५१.२०), कळमनुरी १३.६० (९५०.२०), वसमत ११ (८४४.६०), औंढा नागनाथ ३.९० (८५३.८०) आणि सेनगाव तालुक्यात ११.८० (८३७.९०) मि. मी. पाऊस पडला आहे. सर्व आकडेवारी मिलीमीटर परिमाणात आहे.

### जागतिक माहीती अधिकार दिन साजरा

हिंगोली- येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात जागतिक माहिती अधिकार दिवस साजरा करण्यात आला.यावेळी नायब तहसीलदार डी. एस. जोशी, सचिन जोशी, सहायक माहिती अधिकारी चंद्रकांत कारभारी, भास्कर पांडे, विजय घ्यार, आम्रपाली चोरमारे, कुसुम भिसे, मनकरना जाधव, वहिदा काझी, अलका कोकरे यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील तसेच प्रशासकीय इमारतीतील विविध विभागाचे जन माहिती अधिकारी, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. यावेळी आम्रपाली चोरमारे यांनी माहिती अधिकार कायद्याची थोडक्यात माहिती सांगितली. दि २८ सप्टेंबर हा माहीती अधिकार दिवस आहे.

# औंढा नागनाथ तहसील कार्यालयात जागतिक माहीती अधिकार दिन साजरा



**तभा वृत्तसेवा**
**औंढा नागनाथ, २७ सप्टेंबर**

येथील तहसील कार्यालयाचे सर्व शासकीय कामाबरोबरच माहिती अधिकाराचे काम देखील योग्य रितीने करुन शासकीय कामकाजामध्ये आपले वर्चस्व प्रस्थापित करा, असे आवाहन सर्व अधिकारी व कर्मचारी यांना केले. यावेळी नायब तहसीलदार वैजनाथ भालेराव यांनी प्रास्ताविक केले. यावेळी माहीती अधिकाराबाबत माहीती देण्यात आली. याप्रसंगी नायब तहसीलदार लता लाखाडे, नायब तहसीलदार अनिता कोलगणे, अव्वल कारकून श्रीकृष्ण दराडे, इम्रान पठाण, संगिता बामनपल्ले, महसूल सहायक भास्कर खंदारे, पुरवठा निरीक्षक पायघन, कु . हटवार, महसूल सहायक शेख हमीद, उंकडी मारकड, नितीन कुलकर्णी, आनंद दातार, शेख सलीम, कैलास जाधव, केशव फलटणकर,आपरेटर संतोष पोले, कांबळे, कदम, वामन मोरे आदींची उपस्थिती होती.

# दराडे विद्यालयाच्या विद्यार्थ्याची कीक बॉक्सिंगमध्ये विभागीयस्तरावर निवड



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ सप्टेंबर**

भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्था संचलित श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे माध्यमिक विद्यालय येथील विद्यार्थी नागेश सखाराम नर्सीकर यांनी १४ वर्षे वयोगटातील किक बॉक्सिंग स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक पटकावला आहे.

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय हिंगोली यांच्यामार्फत स्पर्धेचे आयोजन केले होते. जिल्हास्तरीय किक बॉक्सिंग स्पर्धा सैनिकी शाळा पेठ वडगाव ता. कळमनुरी जि. हिंगोली येथे नुकत्याच पार पडल्या. या विद्यार्थ्याला क्रीडा अध्यापक अनिल लोळेवार यांचे मार्गदर्शन लाभले. नागेश नर्सीकर व क्रीडा अध्यापक अनिल लोळेवार यांचा शाळेचे मुख्याध्यापक डॉ.प्रकाश स. अंभोरे, उपमुख्याध्यापक जितेंद्र भट्ट व पर्यवेक्षक तुलसी चीलमूल यांनी सत्कार केला. संस्थेच्या सर्व सदस्यांनी यशस्वी विद्यार्थी व क्रीडा अध्यापक यांचे अभिनंदन केले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# नारायणराव वाघमारे महाविद्यालयात नवमतदार जनजागृती कार्यक्रम



**तभा वृत्तसेवा**
**कळमनुरी, २६ सप्टेंबर**

भारत निवडणूक आयोगाच्या स्वीप पथकामार्फत नारायणराव वाघमारे महाविद्यालय, आ.बाळापूर येथे नवमतदार जनजागृतीचा कार्यक्रम दि. २७ सप्टेंबर रोजी घेण्यात आला.

यावेळी कळमनुरी विधानसभास्तरीय मतदार जनजागृती पथकातील (स्वीप) कलावंत केंद्रप्रमुख रेखा सुगंधे, कवी गायक शीलवंत वाढवे, विजय सावंत पाटील, संगीत विशारद राजेंद्र पाटील, भीमराव इंगोले, बळवंत राठोड यांनी मतदान जनजागृतीपर शाहीरी गीते सादर केली. मतदानाचे महत्त्व नाट्यात्म पद्धतीने, चटकदार संवाद, शाहीरी गायन, अभिनय यांसह संगीतमय कलाविष्कार याद्वारे पटवून दिले. स्वीप कलापथकातील कलावंतांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मतदानविषयक संदेश दिला. कार्यक्रमास मोठा प्रतिसाद मिळाला. प्राचार्य डॉ. डी.आर. मोरे यांनी यावेळी नवमतदार विद्यार्थ्यांना संबोधित करताना मतदानाचे पवित्र राष्ट्रीय कर्तव्य आणि जबाबदारी पार पाडण्यासंबंधी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास विद्यार्थ्यांसह प्राध्यापक वर्ग प्रा. डॉ. माधव जाधव, डॉ.कुंटे, डॉ.घुगे, प्रा.कऱ्हाळे,प्रा.ए.पी.जाधव, प्रा.मोरे, प्रा. क्षीरसागर, प्रा.कदम, प्रा. उपरे, डॉ. वाघमारे, प्रा.गोमचाळे आदींची उपस्थिती होती.